मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७१४/अपील क्र.५८५६/०२

श्री. राजकुमार अवस्थी ------ अपीलकर्ता
बी/१४, शांती नगर, सी.एस.टी.रोड,
कुर्ला (पश्चिम) मुंबई ४०० ०७०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ------ उत्तरवादी
परिमंडळ ९, बांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड, बांद्रा (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

*- विवेचन -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०२/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस हायकोर्टात दाखल झालेल्या रिट पिटीशन क्र. २७७३/२००८ च्या व्हेरिफिकेशनच्या बाबतीत ज्या कांही सूचना राज्य सरकार किंवा वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्याकडून आल्या असतील त्यासबंधात माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस जन माहिती अधिकाऱ्यांनी जी माहिती दिली आहे त्यावरुन असे दिसते की, रेकॉर्डला यासंबंधी कुठच्याहि प्रकारे लेखी सूचना नाहीत. पोलीस उपनिरिक्षक श्री. प्रकाश दौंड यांना तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीयुत संजय नेकलीकर यांनी तोंडी आदेश देऊन हायकोर्टात पाठविले होते. त्यामुळे दिलेले उत्तर हे स्पष्ट आहे व त्यात अशा प्रकारच्या कुठच्याहि लेखी सूचना किंवा पत्र लिहिलेले नाही असेच स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

अपीलार्थींच्या अर्जामध्ये त्यांनी नस्तीच्या तपासणीची सुध्दा मागणी केलेली आहे. जर अपीलार्थीस प्रत्यक्ष नस्ती बघून अशा प्रकारच्या कुठच्याही लेखी सूचना नव्हत्या याची खात्री करुन घ्यायची असेल तर ते तशी खात्री करुन घेऊ शकतात.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०२.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**मुमाआ/अपील/ २००९/४८१६४/अपील क्र.५८५४/०२**

**श्री. श्रीनिवास पांडये ------ अपीलकर्ता**
**स्वस्तिक पार्क, बी/७/१०६,**
**आझाद नगर, ठाणे - ४०० ६०७.**

**विरुध्द**

**१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव ------ उत्तरवादी**
**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र.**
**१३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,**
**मंत्रालयसमोर, मुंबई ३२.**

**२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी**
**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र.**
**१३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,**
**मंत्रालयसमोर, मुंबई ३२.**

***- वि वे च न -***

**अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०८/०४/ २०१०**
**सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०**
**अपीलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी उपस्थित.**

**कागदपत्रांचे वाचन केले असता जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अर्जासंदर्भात असलेली वस्तुस्थिती निवेदीत केलेली आढळली. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. ३१ मार्च, २०१० रोजीच्या आदेशात दि. १२/५/२००७ रोजीच्या व्दितीय अपीलाची प्रत त्यांनी आयोगास पुरविल्यास त्यावर योग्यती कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट केलेले आहे. कदाचित अपीलार्थींनी अपील, हे सचिव तथा प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अपीलार्थींना**

पोहोचण्याअगोदर केलेले असावे असे दिसते.

वरील विवेचनावरुन पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश----*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०२.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७२७/अपील क्र.५८५८/०२

श्री. दिलीप नेवातिया ------ अपीलकर्ता
शशी दिप, ५- अे, वरळी सी फेस,
मुंबई ४०० ०३०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ------ उत्तरवादी
परिमंडळ ३, बावला कंपाऊंड, बी.ए.रोड,
मुंबई ४००० ०२७.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य प्रादेशिक विभाग, बावला कंपाऊंड,
बी.ए. रोड, मुंबई ४०० ०२७.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २६/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांनी दि. २९/९/२००९ व १२/१/२००९ रोजी त्यांच्या शेजरी असलेले पनहार या इमारतीच्या बांधकामावर असलेल्या ध्वनीप्रदुषणाबाबत तक्रार केलेली होती त्यावर केलेल्या कारवाईसंबंधी माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात पोलीस ठाण्याच्या बीट अधिकाऱ्यांनी दि. ३०/१०/२००९ रोजी भेट देऊन चौकशी केली व किरकोळ कामे चालू असल्यामुळे व त्यास आक्षेप करण्यासारखे ध्वनीप्रदुषण आढळून न आल्यामुळे कुठचीही कारवाई करण्यात आलेली नाही. मात्र त्यातील कामावर देखभाल करणारे व्यवस्थापक श्री. आर रंगराजन यांचा जबाब नोंदवून

आजूबाजूच्या रहिवाश्यांना त्रास होणार नाही याची समज देण्यात आलेली आहे असे कळविण्यात आले.

त्याव्यतिरिक्त इतर कुठचीही कारवाई करण्यात आलेली नाही असे स्पष्ट करण्यात आले व त्या जबाबाची प्रत अपीलार्थीस देण्यांत आलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलार्थींनी असे सांगितले की, त्यांना यासंबंधीच्या रेकॉर्डची तपासणी करायची आहे.

अपीलार्थींना असेहि सांगण्यात आले की, जबाबाव्यतिरिक्त इतर कोणतीही कागदपत्रे नाहीत. मात्र त्यांना त्याची खातरजमा करायची आहे. तेव्हा दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी हे उदया दि. ३/७/२०१० रोजी पोलीस स्टेशनला सकाळी १०-०० वाजता जातील व यासंदर्भात असलेली सर्व कागदपत्रे दाखविण्यात यावीत.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०२.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७५५२१/अपील क्र.५८६१/०२

श्री. रामशंकर सरोज ------ अपीलकर्ता
घनश्यामदास चाळ, रुम क्र.२,
संत रोहिदास मार्ग, काळा किल्ला,
धारावी, मुंबई ४०० ०१७.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ------ उत्तरवादी
जी/उत्तर विभाग कार्यालय, हरिश्चंद्र येवले मार्ग,
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.

२. जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ वसाहत अधिकारी
जी/उत्तर विभाग कार्यालय, हरिश्चंद्र येवले मार्ग,
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १७/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सहायक आयुक्त जी/उत्तर विभाग यांच्या दि. २५/४/२००९ रोजीच्या पत्रानुसार असे दिसून येते की, धारावी येथील ओम दत्त सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्वसन प्रकल्पातील श्रीमती. लक्ष्मीबाई उत्तम खरात आणि श्री. अनिल उमाजी घुंबरे यांची पात्रता अवैध ठरविण्यात आलेली आहे. त्यामुळे संबंधितांविरुध्द पुढील कारवाई काय करण्यात आली याची माहिती अपीलार्थीस पाहिजे होती.

सुनावणीच्या वेळेस हे स्पष्ट झाले की, त्यासंबंधी अजून कुठच्या प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. यासंबंधी कारवाई करीत असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०२.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७२८/अपील क्र.५८५९/०२

श्री. दिलीप नेवातिया ------ अपीलकर्ता
५- अे, शशीदिप, वरळी सीफेस,
मुंबई ४०० ०३०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ------ उत्तरवादी
परिमंडळ ३, बावला कंपाऊंड,
बी.ए. रोड, मुंबई ४०० ०२७.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
मध्य विभाग, परिमंडळ ३, बावला कंपाऊंड,
बी.ए. रोड, मुंबई ४०० ०२७.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २६/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

गु.र.क्र.१२४/०९, कलम ४५२,५०६,३४ भादंविसं प्रमाणे दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास चालू असल्याने व सदरचा गुन्हा हा दखलपात्र स्वरुपाचा असल्याने सदरची कागदपत्रे माहितीचा अधिकार कलम ८ (ज) प्रमाणे नाकारण्यात आलेली होती.

गु.र.क्र.१२४/०९, कलम ४५२,५०६,३४ भादंविसं प्रमाणे दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयाचा तपास चालू होता. तसेच सदर गुन्हयाच्या तपासात फिर्यादी श्रीमती.सुनिता नेवातिया यांनी दि. ०८/०४/०९ रोजी दिलेल्या फिर्यादीप्रमाणे केलेल्या तपासाच्या अनुषंगाने कलम ४५२ भादंविसं प्रमाणे गुन्हा होत नाही व कलम ५०६ भादंविस प्रमाणे अदखलपात्र स्वरुपाचा गुन्हा होतो. सदरची फिर्यादी ही अदखलपात्र स्वरुपाची असल्याने तपासाअंती गुन्हयाची एन.सी.

फायनल समरी मंजूर होण्यासाठी मा. महानगर दंडाधिकारी, २९ वे न्यायालय, दादर, मुंबई यांचेकडे पाठविण्यात आला आहे.

गुन्हयाचा तपास चालू असल्यामुळे अपीलार्थीस आधी माहिती नाकारली होती पण आता तपास पूर्ण होऊन एन.सी. फायनल समरी मंजूर होण्यासाठी महानगर दंडाधिकाऱ्यांकडे प्रकरण सादर करण्यात आलेले आहे. आता अपीलार्थीस यासंबंधी कुठच्याहि नस्तीचे अवलोकन करायचे असेल तर ते निश्चितपणे करु शकतात.

***----आदेश----***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः ०३.०७.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७५५१/अपील क्र.५८६२/०२

श्री. सुर्यकांत चव्हाण ------ अपीलकर्ता
३९/२/३ नवजीवन सोसायटी,
इंदिरा नगर पोलीस चौकी समोर,
सर्वीस रोड, सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०५५.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहमुख्य अधिकारी ------ उत्तरवादी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक भू-व्यवस्थापक (अंधेरी)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १७/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

अपीलार्थीचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा सहायक भू-व्यवस्थापक यांनी अपीलार्थीस १० दिवसांचे आत त्वरित माहिती उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश देण्यात येत आहेत.

*---आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांकः ०३.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७५४८/अपील क्र.५८६५/०२

श्रीमती. विशाखा इंगळे ------ अपीलकर्ता
बी/६, अलंकार सोसायटी,
टिळक नगर, रेल्वे स्टेशनसमोर, चेंबूर (पश्चिम)
मुंबई ४०० ०४९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त(शिक्षण) ------ उत्तरवादी
उपायुक्त शिक्षण यांचे कार्यालय (मनपा)
एफ/दक्षिण, पालिका विभाग कार्यालय इमारत,
३ रा मजला, परेल, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी
मनपा लखमशी नप्पू रोड, हिंदू कॉलनी,
दादर (पूर्व) मुंबई ४०० ०१४.

## - वि वे च न -

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १७/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित मात्र त्यांनी निवेदन दिलेले आहे, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी अनुपस्थित.

नुकतेच अपीलार्थीच्या ३ तक्रारींबाबत दि. ६/२/२०१० रोजी आयोगाने निर्णय दिलेला आहे. अपीलार्थीस द्यावयाची माहिती तयार आहे पण त्या स्वीकार करीत नाहीत असे निदर्शनास आणल्यावरुन त्यांनी त्या माहितीचा स्वीकार करावा असे निर्देश देण्यात येत आहेत.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी असे निदर्शनास आणले की, दि. २०/१२/२००९ रोजी प्राप्त झालेल्या माहितीचा अधिकारांतर्गतच्या अर्जावर दि.

२७/१/२०१० रोजी १०/- शुल्क भरणा करण्याचे पत्र पाठविण्यात आलेले असून अजूनपर्यंत अपीलार्थींनी शुल्काचा भरणा केला नाही व त्या कार्यालयातहि आलेल्या नाहीत.

त्यामुळे अपीलार्थींनी शुल्क भरुन माहिती मिळण्याच्या तरतुदीचे पालन करुन ही माहिती घेऊन जावी असे निर्देश देण्यांत येत आहेत.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ०३.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४६८०४/अपील क्र.५८६६/०२

श्री. भालचंद्र सिगम ------ अपीलकर्ता
चंदन मेंशन, ३ रा मजला,
रुम नं. ५८, ना. गोखले मार्ग,
पोर्तुगिज चर्चसमोर, दादर (पश्चिम) मुंबई २८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
जी/ उत्तर विभाग, हरिश्चंद्र येवले मार्ग,
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता नगररचना (i)
जी/ उत्तर विभाग, हरिश्चंद्र येवले मार्ग,
दादर (पश्चिम) मुंबई ४०० ०२८.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०८/०२/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस विचारलेल्या माहितीपैकी कुठच्याच गोष्टी पूर्णत्वास आलेल्या नसल्यामुळे त्यांना माहिती देण्यात आलेली नाही. सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षाशी चर्चा करुन पुढीलप्रमाणे ठरविण्यात आले.

१. अपीलार्थीस एलिजीबिलीटी क्रायटेरियाच्या बाबतीत जी कांही परिपत्रके असतील त्याच्या प्रती देण्यांत याव्यात.

२. ट्रायपॅर्ट्रेट ॲग्रीमेंट अजूनहि तयार झालेले नाही ते तयार झाल्यानंतर देण्यात येईल

३. श्रीयुत रविंद्र घोगरे , दत्ताराम विठोबा जाधव, कविता हरिश्चंद्र भोसले , वनिता भोसले

यांनी एलिजीबिलीटी क्रायटेरियासाठी दिलेले डॉक्युमेंटस कलम ११ खालील कारवाई करुन देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

४. ॲनेक्चर-ii हे अजूनहि अंतिम करण्यात आलेले नाही. ते अंतिम झाल्यावर अपीलार्थीस त्याची प्रत देण्यात येईल.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०३.०७.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७५४९/अपील क्र.५८६४/०२

श्री.सॅमसन रॉड्रीक्स ------ अपीलकर्ता
११७, कालिना व्हिलेज,
सांताक्रुज (पूर्व) मुंबई ४०० ०२९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ------ उत्तरवादी
परिमंडळ ९, कार्टर रोड, बांद्रा (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष, कार्टर रोड, बांद्रा (पश्चिम)
मुंबई ४०० ०५०.

- वि वे च न -

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १५/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०२/०७/२०१०
अपीलार्थी उपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिक्ारी अनुपस्थित.

अपीलार्थीस त्यांनी दि. ७ ऑगस्ट २००६ रोजी जो पोलीस स्टेशनमध्ये तक्रार अर्ज केला होता त्यावर झालेल्या कारवाईची माहिती पाहिजे होती.

अपीलार्थीस उत्तर देतांना असे कळविण्यात आलेले आहे की, अपीलार्थींनी जी तक्रार वाकोला पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेली आहे ती तक्रार त्यांनी सांताक्रुज पोलीस स्टेशनमध्ये दाखल करावी. वरील उत्तराने समाधान न झाल्यामुळे व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी योग्यती माहिती दिलेली असल्याचे अपिलीय आदेशात नमूद केल्याने अपीलार्थी यांनी आयोगाकडे धाव घेतलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीचा मुळ अर्ज पाहिला असता त्यांची जी तक्रार आहे ती वारसा हक्काने झालेल्या नोंदीच्या बाबतीतली असल्याचे दिसून येते. अर्थातच सदर बाबतीत महसूल/दिवाणी न्यायालय यांनी कारवाई करण्याची आहे. सदरील बाबतीत कायदेशीर सल्ला घेऊन पुढील कारवाई करीत असल्याचे अपीलार्थी यांनी सांगितले.

<u>*----आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०३.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४४५९६/अपील क्र.५४११/०२

श्री. वसंत एस. आदितीरावितार ------ अपीलकर्ता
ग्रीन हिल को.हौ.सोसायटी, २५-बी/४०२,
नवीन दिंडोशी, गोरेगांव (पूर्व) मुंबई ४०० ०६५.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ------ उत्तरवादी
अतिक्रमण यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, तळमजला, रुम नं. ६८
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार अतिक्रमण/निष्कासन
अतिक्रमण यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, तळमजला, रुम नं. ६८
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*- वि वे च न -*

श्री. वसंत एस.आदितीरावितार यांनी आयोगाकडे अपील क्र. ५४११ मध्ये दिलेल्या आदेशाचे पालन करण्यात आलेले नाही व त्यांना माहिती मिळालेली नाही अशी तक्रार केलेली आहे. या तक्रारीची सुनावणी दि. २ जुलै, २०१० रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अपीलार्थींच्या तक्रारीबाबत जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे.

" मा.मुख्य आयुक्त यांचेकडील उपरोक्त नोटीस पूर्वी प्राप्त न झाल्याने सुनावणीच्या वेळेपर्यंत मी खुलासा करु शकलो नाही त्याबद्दल प्रथम क्षमस्व.

आपल्याकडील उपरोक्त अपीलाबाबतच्या आदेशात अपीलकर्त्यांना माहिती देणेबाबत

निर्देशित केले होते. तथापि त्यांना सदरची माहिती उपलब्ध न झाल्याने देता आली नाही. तसे त्यांना मात्र लेखी कळविले नाही त्याबद्दलही क्षमस्व. मात्र त्यांच्या तक्रारीबाबत (अपीलाबाबत) समाधान करण्यासाठी त्यांना दूरध्वनीवरुन कळविले. तसेच त्याअनुषंगाने ते कार्यालयात उपस्थितही झाले व त्यांचे थोडया फार प्रमाणात का होईना समाधान करण्याचा प्रयत्न या कार्यालयाकडून केला गेला. त्यांनी त्यांच्या तक्रारीत शेवटच्या परिच्छेदात नमूद केलेल्या मुद्दयाबाबत खालीलप्रमाणे खुलासा करीत आहे.

श्री.वसंत आदितीरावीतार यांनी मागणी केल्याप्रमाणे क्रउजि/अति/निष्का/ अंधेरी दौलतनगर/२००६/११९ दि. १८/४/०६ या नोटीसीबाबतचे आदेश त्यांना देणेबाबत कार्यवाही केली जाईल (सदरची नोटीस बांद्रा कार्यालयाची नसून अंधेरी कार्यालयाची आहे. ही प्रकरणे या कार्यालयात प्राप्त झालेली आहे. त्या उपलब्ध अभिलेखात त्यांचे आदेश पारित केले असल्यास त्यांना तात्काळ प्रत देण्यात येईल. आदेश पारित झाले नसल्यास वस्तुस्थितीदर्शक उत्तर त्यांना दिले जाईल.) तसेच त्यांनी मागणी केल्याप्रमाणे परिशिष्ट II च्या प्रती त्यांना पुरविण्यात येतील व त्यांचे हरप्रकारे शंका समाधान करण्यात येईल. तरी कृपया त्यासाठी आठवडयाची मुदत द्यावी ही विनंती. "

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे निर्देश देण्यात आले की, अपीलार्थीस हवी असणारी माहिती १० जुलै, २०१० पूर्वी त्यांना देण्यात यावी.

***---आदेश----***

अपील/तक्रार निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०३.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७३९/अपील क्र.५८७४/०२

श्री. एस. सी. गुप्ता ------ अपीलकर्ता
बी४/२२८, सफदरजंग एन्वलेव्ह,
न्यु दिल्ली - ११००२९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त ------ उत्तरवादी
परिमंडळ २, सर जे. जे. मार्ग,
हयूम हायस्कूल समोर, नागपाडा, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
दक्षिण प्रादेशिक विभाग, सर जे. जे. मार्ग,
हयूम हायस्कूल समोर, नागपाडा, मुंबई.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २०/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०३/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दि. ७/१/२०१० रोजीच्या आदेशानुसार कांही माहिती दि. १० मार्च, २०१० रोजी दिलेली आहे. मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे की, त्यांना त्याव्यतिरिक्त आणखीही कांही माहिती पाहिजे आहे.

दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, सदरील माहिती दर्शविणारे पत्र सुनावणीनंतर लगेचच संबंधित अधिकाऱ्यांनी अपीलार्थी द्यावे. दि. ३० जुलै, २०१० रोजी सकाळी ११-०० वाजता जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार ठेवावी व अपीलार्थींनी त्याची तपासणी करुन निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती शुल्क भरुन अपीलार्थींना देण्यांत याव्यात.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ०३.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७४७/अपील क्र.५८७७/०२

श्री. शैलेश नार्वेकर ------ अपीलकर्ता
६०६, गोमाता नगर, बि.नं. १०,
ट्रान्झिट कॅम्प, नेरोलेक पेंटस जवळ,
गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई १३.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ------ उत्तरवादी
जी/ दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन.एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई.

२. जन माहिती अधिकारी
जी/ दक्षिण विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका,
एन.एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०५/०४/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०३/०७/२०१०
अपीलार्थी व त्यांचे प्रतिनिधी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत मे. स्कायलार्क बिल्डर यांनी बांधलेल्या ट्रान्झिट कॅम्प इमारतीच्या बांधकामाबाबतच्या कागदपत्रांची मागणी केलेली होती.

संक्रमण शिबीराच्या इमारतीबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मंजूरी देण्यात आलेली असल्यामुळे त्यांचा अर्ज झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे असे त्यांना कळविण्यात आले. प्रथम अपिलीय आदेशात जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे असे अपिलीय अधिकारी यांनी ठरविले त्याविरुध्द सदरचे अपील आहे.

सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी सांगितले की, संक्रमण शिबीर ज्या जागेवर बांधले आहे ती जागा मुंबई महापालिकेची आहे, व संक्रमण शिबीर बांधण्यासाठी महापालिकेने जी एन.ओ.सी. दिलेली असेल त्या एन.ओ.सी. च्या संदर्भात जी नस्ती असणार त्यातील प्रत अपीलार्थीस पाहिजे आहे.

एन.ओ.सी. च्या बाबतीतली कागदपत्रे अर्थातच महापालिकेकडे असायला पाहिजे व नस्ती मधील जी कागदपत्रे असतील त्या कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थीस १० दिवसांच्या आंत विनामूल्य देण्यात याव्यात.

***----आदेश---***

अपील मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०३.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७४६/अपील क्र.५८७६/०२

श्री. चंद्रजित राजपूत ------ अपीलकर्ता
सदानंद चाळ, कोतवाडी, डायमंड बेकरी पलिकडे,
सांताक्रुज (पश्चिम) मुंबई ४०० ०५४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनियंत्रक शिधावाटप ------ उत्तरवादी
ड परिमंडळ, उपनियंत्रक शिधावाटप यांचे कार्यालय,
अलका इमारत, सहार रोड, अंधेरी (पूर्व)
मुंबई ४०० ०६९.

२. जन माहिती अधिकारी तथा शिधावाटप अधिकारी
२३ ड , आनंद नगर, सांताक्रुज (पूर्व)
मुंबई.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०५/०४/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०३/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस श्रीमती अंजना कुमारी हरिकृष्णा राजपुत यांना जे रेशनकार्ड देण्यांत आलेले आहे त्याच्या संदर्भात जी चौकशी करण्यात आली होती त्यासंबंधीची माहिती तसेच श्रीमती राजपूत यांनी दिलेल्या स्टेटमेंटची प्रत पाहिजे होती.

अपीलार्थीस श्रीमती अंजना कुमार राजपुत यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती देण्यांत आल्या. मात्र नमुना बी-१ अर्ज हा शोधूनहि सापडला नाही. त्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

"१. श्री.चंद्रजित सिंग राजपूत यांनी दि. १२/३/२००९ रोजी, माहितीचा अधिकार अधिनियम

२००५ अंतर्गत या कार्यालयास अर्ज सादर करुन शिधापत्रिका क्र. २२३२५३ संदर्भ क्रमांक ९५८ अधिकृत शिधावाटप दुकान क्रमांक २३ ड ९० ही शिधापत्रिका मिळणेसाठी केलेल्या अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या तसेच दि. १०/३/२००९ पर्यंत सादर शिधापत्रिकेसंदर्भात सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीची मागणी केली होती.

२. सदर अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक नमुना बी-१ अर्ज शोधण्याचा प्रयत्न करुनही अर्ज न सापडल्याने पुन्हा प्रयत्न करण्याकरिता मुदतवाढ देण्याकरिता दि. ४/४/२००९ रोजी पत्र तयार ठेवण्यात आले होते. दि ६/४/२००९ रोजी श्रीमती. राजपूत कार्यालयात उपस्थित झाल्या असता, त्यांनी सदर पत्र घेण्यास नकार दिला व श्री. राजपूत यांना कार्यालयात पाठविते असे सांगितले. परंतु श्री. राजपूत यांनी कार्यालयाशी संपर्क साधला नाही. तद्नंतर ते दि. २/५/२००९ रोजी कार्यालयात उपस्थित झाले परंतु त्यांनी पत्र स्वीकारण्यास नकार दिला.

३. अर्जदारास आवश्यक असलेला नमुना बी-१ अर्ज सन २००२ म्हणजे ७ वर्षापूर्वीचा आहे. या कार्यालयात कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने, तसेच उपलब्ध कर्मचाऱ्यांपैकीही काही कर्मचारी निवडणूक कार्यालयात कार्यरत असतात. हे कार्यालय जनताभिमुख असल्याने रोज कार्यालयात हजर होणाऱ्या शिधापत्रिकाधारकांची कामे करणे क्रमप्राप्त होते. अशा परिस्थितीत सदर नमुना बी-१ अर्ज शोधण्यासाठी अवधी देणे आवश्यक होते. परंतु अर्जदाराने त्याबाबतचे पत्र स्वीकारण्यास नकार दिला. तरीही कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी कार्यालयात कर्मचाऱ्यांना बोलावून अर्ज शोधण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. ४. सबब आवश्यक नमुना बी-१ अर्ज शोधण्याचा पुन्हा प्रयत्न केला असता सदर अर्ज उपलब्ध झाला नाही. शिधापत्रिकांच्या संगणकीकरणाकरिता सर्व शिधापत्रिकाधारकांकडून सन २००५ मध्ये प्रतिज्ञापत्र भरुन घेण्यात आली होती. श्रीमती. अंजनाकुमार राजपुत यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राची व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती अर्जदारास दि . १६/५/२००९ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

५. अर्जदाराने प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे अपील अर्ज सादर केल्यानंतर त्यांनी दिलेल्या आदेशानुसार पुन्हा सदर नमुना बी-१ अर्ज, कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांच्या मदतीने शोधण्याचा प्रयत्न केला असता उपलब्ध झाला नाही.

६.	या कार्यालयाच्या अभिलेखाचे सन २००२ नंतर जागा तोडून त्याठिकाणी नवीन इमारतीत कार्यालय बांधण्यासाठी दोनदा स्थलांतर झाले असल्याने, सदर स्थलांतरामध्ये सदर अर्ज गहाळ झाला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. "

रेकॉर्डला असलेली माहिती देण्याचा जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केलेला दिसून येतो. अशा परिस्थितीत श्रीमती अंजना कुमारी राजपूत यांच्या वास्तव्यावर आधारित शिधापत्रिकेविषयी जर कांही तक्रार असेल तर त्या तक्रारीची दखल घेण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०३.०७.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७९२१/अपील क्र.५८८१/०२

श्री.चेतन कोठारी ------ अपीलकर्ता
५२, ओशियानिक, डॉ. राजाबाली पटेल लेन समोर,
बी. देसाई रोड , मुंबई ४०० ०२६.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
इलाखा शहर विभाग मुंबई
३ रा मजला, डी.डी.इमारत, जुने जकात घर आवार,
मुंबई ४०० ०२३.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
पश्चिम उप विभाग दक्षि (सां.बा.) उपविभाग
एम.टी.डी.सी कार्यालय समोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १५/०४/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०३/०७/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस मंत्र्यांचे बंगले, राज भवन मध्ये झालेल्या पाण्याच्या वापरासंबंधी व त्याचे बिलासंबंधीची माहिती पाहिजे होती.

सुनावणीच्या वेळेला असे दिसून आले की, अपीलार्थीस ही माहिती उपअभियंता (दक्षिण)सा.बां. उप विभाग व उपअभियंता पश्चिम उपविभाग यांनी पुरविलेली आहे.

राज भवन मुंबई व पुणे येथील पाण्याच्या वापरासंबंधी माहिती देण्याचे संबंधित उपअभियंता यांना कळविण्यांत आलेले आहे.

अपीलार्थी अनुपस्थित असल्यामुळे त्यांचे म्हणणे समजू शकले नाही. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

<u>*----आदेश---*</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांकः ०३.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७१५/अपील क्र.५८८४/०२

श्री. अजय मराठे ------ अपीलकर्ता
५०४, न्यू सर्वोदय सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट २९ ब, वाशी, नवी मुंबई.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ------ उत्तरवादी
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, २/३/ ४ था माळा, सिने प्लेनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व) मुंबई २२.

२. जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,
कल्पतरु पॉईंट, २/३/ ४ था माळा, सिने प्लेनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व) मुंबई २२.

- वि वे च न -

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०१/०४/ २०१०

सुनावणीचा दिनांक ०३/०७/२०१०

अपीलार्थी अनुपस्थित त्यांनी फोन करुन सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली होती. पण अतिवृष्टी असली तरीही येथे येणे शक्य असल्यामुळे व आयोगाकडील येणारी फार मोठया प्रमाणावरील अपीलांची संख्या लक्षात घेता आयोगाने आत्यंतिक परिस्थितीशिवाय सुनावणी पुढे न ढकलण्याचे धोरण स्वीकारलेले आहे त्यानुसार सुनावणी घेण्यांत आली. अपीलार्थींचा अपीलमेमो विचारात घेण्यात आला. जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींना जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती व अपिलीय अधिकाऱ्यांकडील सुनावणीच्या वेळेला दिलेल्या अतिरिक्त माहितीने सुध्दा अपीलार्थींचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केलेले आहे. या द्वितीय अपीलातील मुद्दे व प्रदुषण मंडळाने दिलेले उत्तर पुढीलप्रमाणे आहे -

"मुद्दा क्र. १ अपीलकर्त्याने द्वितीय अपीलामध्ये नमूद केले आहे की, दिवाळी, २००९ मध्ये प्रचंड ध्वनीप्रदूषण झाले होते व त्यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे इतर माहिती बरोबर मप्रनिमंडळाने काय कार्यवाही केली असे विचारले होते व ही माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही असे मंडळाने त्यांना कळविले असल्याबद्दल म्हटले आहे.

उत्तर -- याबाबत, माहिती अधिकारी, मुख्यालय यांनी अर्जदारास दिनाक २७/११/२००९ च्या पत्रान्वये माहिती देताना असे कळविले होते की, दिवाळीच्या कालावधीत केलेल्या ध्वनी तीव्रतेच्या मोजमापनाबद्दलचा अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे व त्यांना मंडळाच्या संकेतस्थळाचा पत्तासुध्दा कळविण्यात आला होता. परंतु अर्जदाराने पोलीसांना तसेच नगरपालिकांना डेसिबल मोजणारी उपकरणे मप्रनिमंडळाकडून देण्यात आली होती. त्यांनी मोजलेले डेसिबल कळावे याबाबत विचारणा केलेली होती. त्या अनुषंगाने माहिती अधिकारी, मुख्यालय यांनी अर्जदारास वरील पत्रानुसार असे कळविले होते की, ध्वनी मोजणारी उपकरणे फक्त पोलीस खात्याला देण्यात आलेली आहेत. डेसिबलबाबतची माहिती मप्रनि मंडळाकडे उपलब्ध नाही व ती पोलीस विभागाकडून घेण्यात यावी. त्यामुळे अपीलकर्त्याने नमूद केलेला वरील मुद्दा चुकीचा आहे.

मुद्दा क्र. २ व ३ सदरहू मुद्दयांमध्ये नमूद केले आहे की, मे. सर्वोच्च न्यायालयाच्या (SC judgment WP ९२ of १९९८ ) निर्णयाप्रमाणे ध्वनी प्रदूषण नियंत्रणाबाबतची जबाबदारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची आहे व मप्रनि मंडळाने दिलेल्या माहितीनुसार ध्वनी प्रदूषण नियंत्रणाची जबाबदारी मंडळाची नाही असे कुठेही दाखवून दिलेले नाही, असे अपीलकर्त्यांचे म्हणणे आहे.

उत्तर -- याबाबत, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्याबाबतचा शासन निर्णय क्र.ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.९५/ताक-१, दिनांक २१/४/२००९ निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार, ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या संस्थांमधील संबंधित अधिकाऱ्यांची पदनाम

प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे विनंतीनुसार ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

त्यामुळे मप्रनि मंडळाची जबाबदारी ही फक्त विनंतीनुसार ध्वनी प्रदूषणाची पातळी मोजण्यापुरती मर्यादित आहे व याबाबत कारवाई करण्याची जबाबदारी वरील शासन निर्णयानुसार संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेली आहे. तसेच औद्योगिक वसाहतीतील ध्वनी प्रदूषणाची नियंत्रण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याची जबाबदारी मप्रनि मंडळाची आहे.

मुद्दा क्र. ४-- मुद्दा क्र. ४ मध्ये अपीलकर्त्यांने असे नमूद केले आहे की, महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने जाहिर केलेल्या अहवालाप्रमाणे ध्वनी प्रदूषण मानके ही विहित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे त्यावर कार्यवाही केली असल्यास तसे कळावे.

उत्तर -- मुद्दा क्र.२ व ३ च्या उत्तरामध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच मप्रनि मंडळाने २००७, २००८ आणि २००९ मध्ये मोजमाप केलेल्या ध्वनी प्रदूषणाची पातळी वर्षानुवर्षे कमी होत आलेली आहे.

वरील सर्व मुद्दयांचे अवलोकन केले असता असे आढळून येते की, अपीलकर्त्यांस मप्रनि मंडळाने सर्व माहिती विहित कालावधीत दिलेली होती. तथापि सदरहू माहिती पुनश्च सादर करण्यात येत आहे. तरी वरील मुद्दयाचा विचार करुन व अपीलकर्त्यास दिलेली माहिती विचारात घेता सदरहू अपील फेटाळण्यात यावे अशी विनंती करण्यात येत आहे. "

त्यामुळे कागदोपत्री असलेली सर्व माहिती जरी देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकाऱ्यांनी केला असला तरी अपीलार्थीस ज्याठिकाणी नॉईज पोलूशन डेसिबेल्टस हे लिगली अलाऊड लेवल पेक्षा जास्त होते त्याठिकाणी कारवाई केली असल्यास तसे कळवावे व कारवाई केली नसेल तर तसे कळवावे अशी अपीलार्थीची पृच्छा आहे. यासंदर्भात प्रदुषण मंडळाने प्रोसिक्युशन कारवाई केली नाही असे सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे. मात्र अशा प्रकारची कारवाई करण्यास तशी सक्षम यंत्रणा ही महापालिका व पोलीस ॲथॉरिटी यांच्याकडे आहे असे त्यांच्या उत्तरात स्पष्ट केलेले आहे व ही बाब मुद्दा क्र. २ व ३ च्या उत्तरात स्पष्ट केलेली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियमामध्ये जशी कागदपत्रे असतील तशी कागदपत्रे देण्यात

येतात.   अपीलार्थीस पॉईंटेड उत्तर हवे आहे असे दिसते व ते उत्तर प्रदुषण मंडळाने वरील दिलेल्या कारणानुसार स्वत:हून कारवाई केलेली नाही  हे आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०६.०७.२०१०    राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७४७५/अपील क्र.५८८५/०२

श्री. अजय मराठे ------ अपीलकर्ता
५०४, न्यू सर्वोदय सोसायटी,
सेक्टर ४, प्लॉट २९ ब, वाशी, नवी मुंबई.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक ------ उत्तरवादी
हायकोर्ट , तळमजला, रुम नं. ८ व ९,
पी डब्ल्यू डी बिल्डींग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी मास्टर & असिटेट प्रोथोनोटररी
हायकोर्ट , तळमजला, रुम नं. ८ व ९,
पी डब्ल्यू डी बिल्डींग, फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १३/०४/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०३/०७/२०१०

अपीलार्थी अनुपस्थित त्यांनी फोन करुन सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती केली होती. पण अतिवृष्टी असली तरीही येथे येणे शक्य असल्यामुळे व आयोगाकडील येणारी फार मोठया प्रमाणावरील अपीलांची संख्या लक्षात घेता आयोगाने आत्यंतिक परिस्थितीशिवाय सुनावणी पुढे न ढकलण्याचे धोरण स्वीकारलेले आहे त्यानुसार सुनावणी घेण्यांत आली. अपीलार्थीचा अपीलमेमो विचारात घेण्यात आला. जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस दि. १३/१/२०१० रोजीच्या वृत्तपत्रिय कात्रणानुसार रिफायनरी जवळच्या बांधकामावर मा. हायकोर्टाने स्थगनादेश दिलेला नाही, मात्र पिटीशन स्वीकृत करण्यात आले अशा वृत्तपत्रिय कात्रणावर आधारित निर्णयासबंधी कांही माहिती अपीलार्थीनी विचारली होती.

दि. २९ मार्च २०१० रोजीच्या अपिलीय आदेशानेहि अपीलार्थीचे समाधान न झाल्यामुळे

त्यांनी आयोगाकडे धाव घेतलेली आहे.

अपीलार्थीची पृच्छा ही न्यायमुर्तीनी पारित केलेल्या आदेशासंदर्भातील आहे. माहितीचा अधिकार २००५ नुसार हायकोर्ट जे "कॉम्पीटंट ॲथॉरिटी "आहे त्यांना माहिती देण्यासंबंधीचे स्वत:चे नियम बनविण्याचा अधिकार आहे त्यानुसार मुंबई हायकोर्टाने जे नियम तयार केलेले आहेत त्यानुसार ज्युडिशियल प्रोसिडींग संबंधीची जी माहिती असेल ती माहिती अपीलार्थीस हायकोर्टाचे जे याबाबतीतील नियम आहेत त्यानुसार मिळवावी लागेल माहितीच्या अधिकारांतर्गत नाही. तेव्हा न्यायिक प्रक्रियेतील माहिती मिळवावयाची असेल तर अपीलार्थीनी त्या मार्गाचा अवलंब करावा. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी तथा रजिस्ट्रार यांच्या आदेशात बदल करावा अशी परिस्थिती नाही.

अपीलार्थीनी मा. न्यामूर्ती यांच्या क्वॉलिफिकेशनच्या बाबतीत जो मुद्दा उपस्थित केला आहे तो मूलत: अनाठायी वाटतो. मात्र जन माहिती अधिकारी यांनी ही माहिती वेबसाईटवर आहे असे लिहिले होते तशी ती उपलब्ध नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांनी जागरुक राहणे आवश्यक आहे.

***----आदेश----***

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०६.०७.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/३९४/अपील क्र.५८८२/०२

मुमाआ/अपील/ २००९/३९५/अपील क्र.५८८३/०२

श्री. महावीर नुनीवाल ------ अपीलकर्ता
के-४/ १२८ डी.एन.नगर, नेपच्यून सोसायटी,
अंधेरी (पश्चिम) मुंबई.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता (इ.व.का) ------ उत्तरवादी
(प.उ.१) मुंबई महानगरपालिका, के-वेस्ट वॉर्ड,
आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०

२. जन माहिती अधिकारी
(प.उ.१) मुंबई महानगरपालिका, के-वेस्ट वॉर्ड,
आर.के.पाटकर मार्ग, बांद्रा (पश्चिम) मुंबई ५०

*- वि वे च न -*

या दोन्ही अपीलातील दोन अर्जांद्वारा अपीलार्थीस त्यांच्या सोसायटीच्या दोन प्लॉटस्च्या अमलगमेशनच्या बाबतीत दिलेल्या मंजूरीची माहिती पाहिजे होती. तसेच सोसायटीने त्यांच्या वार्षिक सभेमध्ये पास केलेल्या प्लान्सच्या बदलास दिलेल्या मंजूरीचे जे रेझूलेशन मंजूर झाले होते त्याची प्रत पाहिजे होती. तसेच याबाबतीत महापालिकेने २९ एप्रिल २००८ रोजी जे प्लान्स पारित केले होते त्याची प्रतहि पाहिजे होती.

प्रथम अपिलीय सुनावणीच्या वेळेला अपीलार्थींनी नस्ती पाहून माहिती घेण्याचे निर्देश देण्यांत आले होते. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार अपीलार्थीस हवी असलेली माहिती नस्तीत असल्याची खात्री करुन ठेवलेली आहे.

सुनावणीच्या वेळेला दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी नस्त्यांच्या तपासणीसाठी बुधवार दि. ७ एप्रिल, २०१० रोजी जन माहिती अधिकारी यांच्या

**कार्यालयात जातील व त्यांना अर्जाशी संबंधित नस्त्या दाखविण्यात येऊन त्यांनी निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलार्थीकडून शुल्क घेऊन देण्यांत याव्यात.**

***<u>----आदेश---</u>***

**दोन्ही अपीले निकाली काढण्यात येत आहेत.**

**संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.**

**( डॉ. सुरेश वि.जोशी )**

**दिनांक: ०६.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.**

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४८२९३/अपील क्र.५८९१/०२

श्री. अनिल अग्रवाल ------ अपीलकर्ता
डी ४०३, विणा नगर, चिंचोली फाटक,
एस.व्ही.रोड, एस.बी.आय.समोर,
मालाड (पश्चिम) मुंबई ४०० ०६४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रधान मुद्रांक अधीक्षक(मुल्यांकन) ------ उत्तरवादी
प्रधान मुद्रांक कार्यालय, नगर भवन,
फोर्ट , मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक उपअधीक्षक (बोरिवली)
मुद्रांक अधिकारी कार्यालय, एम.एम.आर.डी.ए.बिल्डींग,
१ ला मजला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई ५१.

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक ११/५/२०१०
सुनावणीची तारीख ६/७/२०१०
अपीलार्थी अनुपस्थित, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीच्या अपीलासंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक (मुल्यांकन) यांनी पुढीलप्रमाणे अहवाल सादर केला.

" अपीलार्थी श्री. अनिल अग्रवाल रा. डी ४०३, विना नगर, एस.बी.आय च्या पुढे, मालाड (पश्चिम) मुंबई ६४ यांचे माहितीचा अधिनियम २००५ अन्वये दि. १८/१२/२००९ रोजी प्राप्त झालेल्या अर्जावर राज्य जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक उपअधीक्षक यांनी श्री.अग्रवाल यांना माहिती अधिकारातील अर्जामधील मुद्दा क्र. ३ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती अधिकारातील अर्जामधील नमूद केलेले प्रकरण हे पूर्वीच्या वांद्रे विस्तारित कक्षामध्ये असल्याने राज्य

जन माहिती अधिकारी तथा मुद्रांक उपअधीक्षक यांनी श्री. अग्रवाल यांचा माहिती अधिकारातील अर्ज संबंधीत राज्य जन माहिती अधिकारी यांचेकडे सात दिवसाच्या आत वर्ग करावा.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे उपरोक्त आदेशानुसार श्री. अग्रवाल यांचा माहितीच्या अधिकारातील अर्ज संबंधित राज्य माहिती अधिकारी, तथा सहायक नगर रचनाकार, अंधेरी तालुका तसेच राज्य जन माहिती अधिकारी तथा सहायक नगररचनाकर, बोरिवली तालुका येथे वर्ग करण्यात आला आहे. याबाबत राज्य जन माहिती अधिकारी, तथा सहायक नगररचनाकार, अंधेरी तालुका यांनी दि. २६/५/२०१० रोजीचे पत्रान्वये श्री.अग्रवाल यांचे अर्जातील नमूद मालमत्ता त्यांचे कार्यक्षेत्रात येत नसल्याचे तसेच त्यांचे कार्यालयाच्या अभिलेख्यावरुन सदर प्रकरण त्यांचे कार्यालयाकडे वर्ग केलेले नसल्याचे कळविले आहे.

राज्य जन माहिती अधिकारी तथा सहायक नगर रचनाकार बोरिवली तालुका यांनी श्री.अग्रवाल यांचे अर्जावर काय कार्यवाही केली याबाबतचा अहवाल अद्याप या कार्यालयास प्राप्त झ ालेला नाही. "

जन माहिती अधिकारी तथा सहायक नगर रचनाकार बोरिवली तालुका हेहि सुनावणीच्या वेळेला उपस्थित होते. त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी सदरील दस्त शोधण्यास सुरुवात केलेली आहे. पण अजूनहि त्यांना सदरील दस्त उपलबध होऊ शकलेला नाही. मात्र त्याकामी आणखीन १० दिवसांचा अवधी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यसामुळे सदरील शोध पूर्ण करुन अपीलार्थीस १० दिवसांत माहिती देण्याचे निर्देश देण्यांत आले.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार बोरिवली तालुका यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०६.०७.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४८२८८/अपील क्र.५८९४/०२

श्रीमती. शितल आचार्य ------ अपीलकर्ता
द.नं. १२, नडियादवाला चाळ,
झाकेरिया रोड, मालाड (पश्चिम) मुंबई ६४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक मनपा आयुक्त ------ उत्तरवादी
पी/ उत्तर , लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम)
मुंबई ४०० ०६४.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा)
बृहन्मुंबई महानगरपालिका, दत्तात्रय क्रास रोड,
मालाड (पूर्व)

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक १९/५/२०१०
सुनावणीची तारीख ६/७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थीस त्यांच्या शेठ एन.एल. हायस्कूल मधील सेवा संपुष्टात आणल्याच्या आदेशासंदर्भात कांही माहिती पाहिजे होती. ही माहिती शाळेकडून घेऊन देण्यात येईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले होते. त्याप्रमाणे अपीलार्थीस माहिती देण्यांत आलेली आहे व तसा उल्लेख दि. १८/२/२०१० रोजीच्या आदेशात आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ०६.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४८२८७/अपील क्र.५८९६/०२

श्रीमती. शितल आचार्य ------ अपीलकर्ता
द.नं. १२, नडियादवाला चाळ,
झाकेरिया रोड, मालाड (पश्चिम) मुंबई ६४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (शाळा) ------ उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, पी/उत्तर विभाग,
दत्तात्रय क्रॉस रोड, मालाड (पूर्व) मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
शेठ एन.एल. हायस्कूल ( हि.प्रा. शा.)
एस.व्ही. रोड, मालाड (पश्चिम) मुंबई.

*- विवेचन -*

अपीलाचा दिनांक १९/५/२०१०
सुनावणीची तारीख ६/७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींनी त्यांच्या दि. १८/३/२०१० रोजीच्या अर्जाने त्यांच्या सेवा संपुष्टात आणल्याच्या संदर्भात तसेच शाळेविषयी कांही माहिती मागितली होती.

मात्र यासंदर्भात अपीलार्थी स्वतःच हायकोर्टात गेलेल्या आहेत म्हणून ही माहिती कोर्टामार्फत मागवावी असे उत्तर अपीलार्थीस देण्यात आले.

एखादे प्रकरणे हे कोर्टात असेल तर माहिती देण्यात येणार नाही हा पवित्रा चुकीचा आहे. कोर्टाने यासंदर्भात माहिती न देण्याचा विवक्षित आदेश पारित केला असेल किंवा मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या कलम ८ मधील अपवादाअंतर्गत येत असेल तर ती माहिती नाही दिली तरी चालू शकेल. एरवी माहिती देणे हे क्रमप्राप्तच आहे ही बाब सुनावणीच्या वेळेला मुख्याध्यापक

तथा जन माहिती अधिकारी यांना स्पष्ट करण्यात आली. त्यानुसार सुनावणीच्या वेळेला अपीलार्थीना हवी असणारी माहिती ही १० दिवसांचे आत जन माहिती अधिकारी यांनी द्यावी.

*----आदेश---*

अपील मान्य करण्यात येत आहे.
जन माहिती अधिकारी यांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०६.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४८२७९/अपील क्र.५८९८/०२

श्री. अनिश संजय कसबे ------ अपीलकर्ता
संत ज्ञारेश्वर सोसायटी, संजग नगर,
विक्रोळी पार्क साईट, विक्रोळी (पश्चिम) मुंबई ७९.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता ------ उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,
३ रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व)

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता (इ.व.का)
बृहन्मुंबई महानगरपालिका, एन विभाग,
२ रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व)

*- वि वे च न -*

अपीलाचा दिनांक १३/५/२०१०
सुनावणीची तारीख ६/७/२०१०
अपीलार्थी , जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सदर अपीलाच्या बाबतीत दोन्ही पक्षाशी चर्चा करुन असे ठरविण्यात आले की, अपीलार्थी दि. १२/७/२०१० रोजी दुपारी ३-०० वाजता जन माहिती अधिकाऱ्यांच्या कार्यालयात जातील. त्यांना सर्व रजिस्टर दाखविण्यात यावीत व त्यांनी निवड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्यांना देण्यात याव्यात.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ०६.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७७४५/अपील क्र.५८७५/०२

श्री.ललित कुमार सुराणा ------ अपीलकर्ता
द्वारा- ललित इलेक्ट्रॉनिक्स, शॉप नं. ८,
पंजाबी चाळ नं.४, गोळीबार रोड,
जवाहर नगर, खार (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ------ उत्तरवादी
गुन्हे अन्वेषण विभाग, कक्ष १ ई,
पोलीस आयुक्त कार्यालय आवार, क्रॉफर्ड मार्केटसमोर,
मुंबई.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
गुन्हे विभाग, आर्थिक गुन्हे विभाग,
पोलीस आयुक्त कार्यालय आवार, क्रॉफर्ड मार्केटसमोर,
मुंबई.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०५/०४/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०३/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या अपीलासंबंधी पुढीलप्रमाणे निवेदन सादर केले.

" श्री. ललीत मांगिलाल सुराणा यानी माहितीच्या अधिकारान्वये आगुशा गु.र.क्र.४७/०९ कलम ४२०, ३४ भादवि सह कलम ४,५,६ पी.सी. ॲन्ड सम.सी (बॅन) ॲक्ट १९७८ संबंधीत माहिती मागविलेली आहे. या कार्यालयातील उपलब्ध अभिलेखावरुन व गुन्हयाच्या तपासासंबंधी मागितलेली माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

२. गायकवाड उस पर कोईभी कार्यवाही नाही करते हे / मुख्य आरोपी ये जान जाता की उसपर और उसकी कंपनीपर मै एफआयआर दर्ज कर चुका हुॅ / अपसोस इस बात का है ऑखे के सामने

आरोपी होने के बाद भी अर्जुन गायकवाड कार्यवाही क्यो नही करते है १ क्या कारण था मुझे उसका रिटन मे जबाब चाहिये /

उत्तर -- नमूद गुन्हयातील आरोपीवर वरिष्ठांच्या आदेशान्वये कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

१. आरोपी व सी.एम.डी. चंद्रशेख चितारी यास दि. १५/४/२०१० रोजी अटक करण्यात आली होती. त्यांना दि. १७/६/२०१० रोजी मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, १९ वे न्यायालय, मुंबई यांनी जामीनावर मुक्त केले आहे.

२. आरोपी राजेश वर्मा यास दि. ३१/१२/२००९ रोजी अटक करण्यात आली होती. त्यांना दि. १२/१/२०१० रोजी मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी , १९ वे न्यायालय, मुंबई यांनी जामीनावर मुक्त केले आहे.

३. आरोपी को ये पता चल जाना की उसकी कम्पनी पर एफआयआर हो चुकी है / उसके बाद भी मेरे द्वारा बताये गये कम्पनी के ६ बँक अकाऊन्ट को तुरन्त फ्रिज करने के बजाय बार बार आग्रह करने पर भी मुख्य आरोपी को ४ से ५ महिने का समय दिया जाना कितना उचित है / बाद मे ६ बॅक एकाऊन्ट मे मात्र एक लाख पच्चीस हजार रुपया ही फ्रिज करना ये बात गले से नही उतर रही है / इस लिए मै ये चाहुंगा की मुझे १/५/२००९ से लेकर फ्रिज होने तक से सभी बैंक अकाउन्ट का बैक स्टेटमेन्ट मुझे चाहिये १ आपसे विनम्र निुरोध /

उत्तर -- सदर गुन्हयाच्या तपासात आजपर्यंत आरोपीचे एकूण १० बँक खाती गोठविण्यात आली आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे ः

सीएमडी चंद्रशेखर सी व बँगलोर टु व्हॅल्यू मार्केटींग प्रा.लि. ची बँक खाती / गोठविण्यात आलेली रक्कम

१. आयसीआयसीआय बँक, राजाजी नगर, बॅग्लोर, कनार्टक राज्य, खाते क्र. ०२९६०५००४७०७ (अेएन डब्ल्यू बी ) / रु.३४,८४९.००

२. आयसीआयसीआय बँक, राजाजी नगर, बॅग्लोर, कनार्टक राज्य, खाते क्र. ०२९६०५००२६५२ / रु. ३३,८८१.००

३. एक्सीस बँक, बसवेश्वर नगर बॅग्लोर, कनार्टक राज्य खाते क्र. ०६५०१०२००१८४१६/ रु.

१६,३५८.१४

४. एचडीएफसी बँक लि. बॅग्लोर ,कनार्टक राज्य, खाते क्र.००७६२५६०००१६३८/ रु.१९,३२८.००

५. आयएनजी वैश्य बँक लि,बॅग्लोर, कनार्टक राज्य,खाते क्र.सीए, एसी नंबर २०८०११००९३९३ / रु. ३,४८५.६०

६. आयसीआयसीआय बँक, एस.व्ही.रोड. अंधेरी (पूर्व) मुंबई खाते क्र.००१८०५०१०४७३/ रु. ३४,८३४.५४

७. आयसीआयसीआय बँक, एस.व्ही.रोड. अंधेरी (पूर्व) मुंबई खाते क्र.००१८०५०१०४७४/ रु. ३७,५९४.९८

८. आयसीआयसीआय बँक, एस.व्ही.रोड. अंधेरी (पूर्व) मुंबई खाते क्र.००१८०५०१०४७५/ रु. ५३,६०१.८२

आरोपी राजेश मोतीलाल वर्माचे बँक खाते

९. आयसीआयसीआय बँक, गोरेगांव, मुंबई खाते क्र. ६४३४०५०५२३३ / रु.१६१.५१

आरोपी राजेश वर्मा याचा भाऊ विनोद कुर्मी ऊर्फ वर्माचे बँक खाते

१० आयसीआयसीआय बँक, अंधेरी (प)मुंबई खाते क्र.००११०१२०१९४९/ रु.१८७८.५३ व एफ.डी. अकाऊंट नं. १२०३००३१०५१८७०३० रु. ५५५८४/-

वरील नमूद प्रमाणे नमूद गुन्हयामध्ये ११ बँक अकाऊंट फ्रिज करण्यात आली असून त्यामध्ये रक्कम एकूण रु. २,९१,३९५.६१ पैसे

नमूद गुन्हा फौ.दं.प्र.स कलम १७३(८) प्रमाणे तपासाधीन आहे. त्यामुळे बँक अकाऊंट स्टेटमेंट बाबतची माहिती ही माहितीचा अधिकार २००५ कलम ८(१) (ज) (ह)अन्वये माहिती देता येत नाही.

४. उसी प्रकार आरोपी राजेश वर्मा के बैंक एकाऊंट का बँक स्टेटमेंट एकाऊंट शुरुवात पासून फ्रि होने तक का बँक स्टेटमेंट मुझे चाहिये/ एकाऊंट जिस दिन से ओपन हुआ उस दिन से फ्रिज होने तक का बँक स्टेटमेंट चाहिये /

उत्तर -- नमूद गुन्हा फौ.दं.प्र.स. कलम १७३(८) प्रमाणे तपासाधीन आहे. त्यामुळे बँक अकाऊंट स्टेटमेंट बाबतची माहिती ही माहितीचा अधिकार २००५ कलम ८ (१)(ज)(ह) अन्वये माहिती देता

येत नाही.

५. मुम्बई मे मुख्य आरोपी के दो ऑफिस थे एक ऑफिस ऐजन्ट राजेश वर्मा का था / उस सभी जगह पर भी एक आय गायकवाडने रेड करने पर कितने कम्प्युटर तीनो जगहो से सिज किये. लेपटॉप कितने सिज किये. कितने हार्डडिस्क की अब तक जॉच हुई उसकी हार्डडिस्क की क्या रिपोर्ट है / जाँच करने पर क्या जानकारी मिली हमे उसकी जानकारी चाहिये / तीनो जगहों से अन्य वस्तुए क्या क्या बरामद हुई वहॉ पर रेड करने के बाद क्या स्टेटमेन्ट रेकॉर्ड किया गया और कंपनी ने तीनो ऑफिस रेन्ट (पर किराय) पर लिये हुए थे वो उनके मालिक द्वारा बनाये गये एग्रीमेन्ट की कॉपी और उसका स्टेटमेन्ट कॉपी जो वक्त लिया गया / सभी डुप्लीकेट कॉपी मुझे चाहिये/ आप से विनम्र अनुरोध है/ इस की जानकारी प्राप्त करना मेरा मौलीक अधिकार है / मुझे मिलना चाहिये /

उत्तर -- नमूद गुन्हयामध्ये ५ हार्ड डिस्क ताब्यात घेण्यात आलेल्या आहेत. नमूद गुन्हा फौ.दं.प्र.सं. कलम १७३(८) प्रमाणे तपासाधीन आहे. त्यामुळे उपरोक्त प्रश्नाबाबतची इतर माहिती ही माहितीचा अधिकार २००५ कलम ८ (१)(ज)(ह) अन्वये माहिती देता येत नाही.

६. आरोपी राजेश वर्मा ३१/१२/२००९ को पी.एस.आय. अर्जून गायकवाड द्वारा गिरफ्तार किया जाना है/ उस १२ दिनो का रिमान्ड मिलता है / मैने केस इन्चार्ज को राजेश वर्मा के पास लाखो रुपया होने का सबुत भी दिया है / उस १२ दिनो मे सबुत देने के बाद केस इन्चार्ज ने क्या रिकवरी की , १२ दिनो मे आरोपी को इन्क्वारी के लिए जेल से कब-कब बहार निकाला और कहॉ कहॉ ले गये उससे क्या स्टेटमेन्ट रेकॉर्ड किया गया सम्पुर्ण डिटेल मुझे चाहिये आपसे विनम्र अनुरोध /

उत्तर --- नमूद गुन्हा फौ.दं.प्र.स कलम १७३(८) प्रमाणे तपासाधीन आहे. त्यामुळे उपरोक्त प्रश्नाबाबतची माहिती ही माहितीचा अधिकार २००५ कलम ८ (१)(ज)(ह) अन्वये माहिती देता येत नाही.

७. आरोपी राजेश वर्मा को किला कोर्ट ऑर्डर का डुप्लीकेट कॉपी मुझे चाहिये आपसे विनम्र अनुरोध कर रहा हू/ अबतक राजेश वर्मा रिहा हाने के बाद कितनी बार कोर्ट मे और आपके पास हजिर हुआ कब कब हुआ उस की जानकारी दे /

उत्तर -- नमूद गुन्हा फौ.दं.प्र.स कलम १७३(८) प्रमाणे तपासाधीन आहे. त्यामुळे उपरोक्त प्रश्नाबाबतची माहिती ही माहितीचा अधिकार २००५ कलम ८ (१)(ज)(ह) अन्वये माहिती देता येत

नाही.

८. मुख्य आरोपी को गिरफ्तार करने पी.एस.आय. गायकवाड कितने स्टाफ के साथ बंगलोर गये वहॉ कहॉ रुके मैने दि. ०२/०१/०९ को जो अर्जी दि है / उसमे आवश्यक असलेल्या माहिती मॉगी थी / उस अर्जी मे मुख्यत ५ पॉईंट दिये हुए है / उन सभी का जबाब चाहिये बँगलोर का ऑफिस अभी ही चालू है / कम्पनी का नेटवर्क का बिजनेस अभी भी चालू है / आप अब तक बॅगलोर की कार्यवाही मे जो भी स्टेटमेन्ट वहॉ का आपने लिया है/ उसकी डुप्लीकेट कॉपी देने का कष्ट करे /

उत्तर --- नमूद गुन्हा फौ.दं.प्र.स कलम १७३(८) प्रमाणे तपासाधीन आहे. त्यामुळे उपरोक्त प्रश्नाबाबतची माहिती ही माहितीचा अधिकार २००५ कलम ८ (१)(ज)(ह) अन्वये माहिती देता येत नाही.

९. मुख्य आरोपी ने सेसन कोर्ट मे एन्टरी सिपेटरी बेल के लिए सिटी सिविल कोर्ट नं.५५ ने अर्जी नं. १२४७/०९ की थी उसे कोर्ट द्वारा नकारा गया उस कोर्ट ऑर्डर की डुप्लीकेट कॉपी चाहिये /

उत्तर -- सदरचा अभिलेख हा न्यायालयाच्या अखत्यारितील बाब आहे.

१०. दिनांक २/२/२०१० से आजतक आपने मुख्य आरोपीको गिरफ्तार क्यो नाही किया१ आप श्रीमान पीएसआय अर्जुन गायकवाड सर से मुझे इस बातका जबाब चाहिए कि आरोपी जबतक हायकोर्ट मे अपील नही करेगा क्या आप उसपर कार्यवाही नही करते की कसम खा रखी है / अबतक मुख्य आरोपी को गिरफ्तार करनेके बजाय उसे बचानेके लिए आप जानबुजकर कार्यवाही नही कर रे है / अगर आपको केस मे रुची नही है तो क्यो नही आप किसी दुसरे ऑफीसर को केस सोप देते है / हमी आपसे बेहद नाराजगी है / कृपया कर हमे जबाब दे आपसे विनम्र अनुरोध /

उत्तर --- नमुद गुन्हयातील मुख्य आरोपी व सी.एम.डी. चंद्रशेखर चितारी यास दि.१५/४/२०१० रोजी अटक करण्यात आली होती. त्यास दि. २२/४/२०१० पर्यंत मा.अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, १९ वे न्यायालय, आझाद मैदान, मुंबई यांनी पोलीस कोठडी रिमांड आदेशीत केले होते. त्यानंतर न्यायालयीन कोठडी आदेशीत केले व त्यास मध्यवर्ती कारागृह ,आर्थर रोड, मुंबई ११ येथे ठेवण्यात आले होते. त्यास दि. १७/६/२०१० रोजी मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, १९ वे न्यायालय, मुंबई यांनी जामीनावर मुक्त केले आहे.

११. अबतक आपने मुख्य आरोपी के सहयोग जया पुजारी राजेश एम वर्मा का भाई विनोदी कुर्मी

एवम उसका सहयोगी रमेश यादव से आपने क्या पूछताछ की एन सभीका जो स्टेटमेन्ट आपने रेकॉर्ड किया है उसकी डुप्लीकेट कॉपी मुझे देनेका कष्ट करे /

उत्तर -- नमूद गुन्हा फौ.दं.प्र.स कलम १७३(८) प्रमाणे तपासाधीन आहे. त्यामुळे उपरोक्त प्रश्नाबाबतची माहिती ही माहितीचा अधिकार २००५ कलम ८ (१)(ज)(ह) अन्वये माहिती देता येत नाही.

१२. ५ स्टार कंपनीके मालिकको कंपनीको आरोपी राजेश एम वर्माने टेकओवर करके उस कंपनीसे काम करना आरंभ (सुरु) किया उस विषयमे इद्रीस भाईसे आपने क्या स्टेटमेन्ट लिया / कुर्लामे राजेश वर्माने खुदने जो ऑफीस खोला था उसका मालिकसे अग्रीमेंट कॉपी लिया होगा उसको स्टेटमेन्ट एक एग्रीमेंट का झेरॉक्स कॉपी दोनो का एग्रीमेंट व स्टेटमेंट का डुप्लीकेट कॉपी मुझे देनेका कष्ट करे /

उत्तर -- नमूद गुन्हा फौ.दं.प्र.स कलम १७३(८) प्रमाणे तपासाधीन आहे. त्यामुळे उपरोक्त प्रश्नाबाबतची माहिती ही माहितीचा अधिकार २००५ कलम ८ (१)(ज)(ह) अन्वये माहिती देता येत नाही. "

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, अपीलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे व जी माहिती देण्यात आलेली नाही त्याचे कारण अजूनहि तपास चालू असल्यामुळे काही माहिती अजूनहि देण्यात आलेली नाही. पण मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता माहिती देण्यास जो अपवाद अधिनियमाच्या कलम ८ मध्ये दर्शविण्यात आलेला आहे त्या अपवादात्मक परिस्थितीमध्ये सदरील केस येते. त्यामुळे जी माहिती देण्यासारखी होती ती देण्यांत आलेली आहे व जी देण्यात आलेली नाही त्याला मुख्य कारण तपास अजून संपलेला नाही व माहिती आता दिल्यास त्याचा तपासावर परिणाम होऊ शकतो हे आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

<u>*----आदेश---*</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०७.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७५८४/अपील क्र.५८९९/०२

श्रीमती आदिती गोयल ------ अपीलकर्ता
३५४, टॉप फ्लोअर, सेक्टर ३८ अे,
चंदिगड- १६००१४.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ------ उत्तरवादी
झोन ७, अन्न व औषध प्रशासन,
३ रा मजला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी
झोन ७, अन्न व औषध प्रशासन,
३ रा मजला, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक २२/०३/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०६/०७/२०१०

अपीलार्थींनी त्यांना आता माहिती मिळालेली असल्यामुळे अपील चालविण्यात स्वारस्य नाही त्यामुळे सदरचे अपील परत घेत आहे अशा आशयाचा फॅक्स ३ जुलै २०१० रोजी आयोगास पाठविलेला आहे. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*---आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ०७.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४८३१५/अपील क्र.५९०२/०२

श्रीमती अनिता पेडणेकर ------ अपीलकर्ता
पुजा बंगला नं ८, म्हाडा कॉलनी,
इस्टर्न एक्सप्रेस हायवे, मुलुंड (पूर्व)
मुंबई ४०० ०८१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी ------ उत्तरवादी
प्रमुख वैद्यकीय अधिकारी, भाभा हॉस्पीटल,
बांद्रा (पश्चिम) मुंबई ४०० ०५०.

२. जन माहिती अधिकारी
प्रमुख वैद्यकीय अधिकारी
संत मुक्ताबाई रुग्णालय, बर्वे नगर, घाटकोपर.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक १०/०६/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०६/०७/२०१०
अपीलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळेला हे स्पष्ट झाले की, अपीलार्थीस त्यांनी त्यांच्या ३ अर्जांमधून मागितलेली जवळपास सर्व माहिती देण्यात आलेली आहे. फक्त महापालिकेने श्रीमती. मनिषा विठ्ठल गाडगिळ यांच्याविरुध्द जी चौकशी करण्याचे ठरविले होते त्याच्या अहवालाची प्रत अपीलार्थींना मिळालेली नाही.

वैद्यकीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरील चौकशी पूर्ण व्हायची आहे. तो अहवाल आल्यानंतर अपीलार्थीस त्याची प्रत देण्यात येईल. अजून अहवालच तयार झाला

नसल्यामुळे त्याची प्रत देता येत नाही हे म्हणणे मान्य करण्यात येत आहे  व अपीलार्थीनाहि ते पटले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०७.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४४६९६/अपील क्र.५९०१/०२

श्री. संजय के. कोकणे ------ अपीलकर्ता
डी- ७०१, मीना टॉवर्स, स्वस्तिक पार्क,
सी.एस.टी.रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य अभियंता ----- उत्तरवादी
(इमारत प्रस्ताव)पूर्व उपनगरे,
बृहन्मुंबई महानगरपालिका, पेपर मिल कंपाऊंड,
राज लिगेसीजवळ, एल.बी.एस. मार्ग,
विक्रोळी (पश्चिम) मुंबई ४०० ०८३.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)
बृहन्मुंबई महानगरपालिका, पेपर मिल कंपाऊंड,
राज लिगेसीजवळ, एल.बी.एस. मार्ग,
विक्रोळी (पश्चिम) मुंबई ४०० ०८३.

*- वि वे च न -*

अपील प्राप्त झाल्याचा दिनांक ०६/०४/ २०१०
सुनावणीचा दिनांक ०६/०७/२०१०
अपीलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपीलार्थींना AVIATION FUNNEL ZONE मध्ये येणाऱ्या बिल्डींग परमिशनच्या बाबतीत बरीचशी माहिती पाहिजे होती. व त्यासाठी त्यांनी महापालिकेकडे अर्ज/ अपील केले होते.

अपीलार्थींना ज्या स्वरुपात माहिती पाहिजे होती त्यासाठी सर्व बिल्डींग परमिशनचा अभ्यास करुन त्याचे ॲनॅलिसिस व टॅब्यूलेशन करणे आवश्यक होते व ते काम फार मोठया स्वरुपाचे असल्यामुळे अपीलार्थींना हव्या तशा स्वरुपात माहिती देणे हे कठीण आहे. त्यामुळे अपीलार्थींनी

कांही विवक्षित इमारतींची माहिती विचारली तर ती निश्चितपणे दिल्या जाऊ शकेल असे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. २१/४/२००९ रोजीच्या आदेशात स्पष्ट करण्यात आलेले आहे. अपीलार्थींचे सदरील अपील हे या आदेशाविरुध्दचे आहे.

अपीलार्थी व त्यांच्यासमवेत आलेले श्रीयुत एच.के. क्लुबवाला यांनी आयोगास चेंबूर एरीयात होऊ घातलेल्या उत्तुंग इमारतीमुळे इन्फ्रा स्ट्रक्चरल व सामाजिक परिस्थितीवर होणाऱ्या परिणामाबद्दल चिंता व्यक्त केली व त्यासंदर्भात ते हि माहिती मागत आहेत असे स्पष्ट केले.

अपीलार्थी यांच्याशी त्यांच्या प्रश्नाबद्दल प्रदिर्घ चर्चा करण्यात आली व अंतिमतः असे ठरविण्यात आले की, अपीलार्थीनी सुरुवातीला त्यांना हव्या असलेल्या ५ बिल्डींग परमिशनसंबंधीच्या नस्त्यांची पाहणी करावी व त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती त्वरित देण्यात याव्यात. त्यानंतर जर आवश्यकता वाटली तर अपीलार्थी आणखीहि काही माहिती मागू शकतील. तसे करण्याचे अपीलार्थींनी मान्य केले व महापालिका अधिकाऱ्यांनी त्याप्रमाणे सत्वर माहिती देण्याचे मान्य केले. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***----आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांकः ०७.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८अन्वये दाखल झालेली तक्रार.

मुमाआ/अपील/ २०१०/४२२६४/तक्रार क्र.९३४/०१

श्री. नितीन तुकाराम गवाणकर ---तक्रारदार
०५, गवाणकर निवास, साईकृपा बिल्डींगसमोर,
शिववल्लभ मार्ग,दहिसर (पूर्व) मुंबई ६८.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ----- उत्तरवादी
(अति/निष्कासन) यांचे कार्यालय,
बृहन्मुंबई महानगरपालिका मंडई, तळमजला,
रुस्तमजी कॉम्प्लेक्स, जयवंत सावंत मार्ग,
दहिसर (पश्चिम) मुंबई ४०० ०६८.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (अति/निष्कासन)
उपजिल्हाधिकारी (अति/निष्कासन) यांचे कार्यालय,
बृहन्मुंबई महानगरपालिका मंडई, तळमजला,
रुस्तमजी कॉम्प्लेक्स, जयवंत सावंत मार्ग,
दहिसर (पश्चिम) मुंबई ४०० ०६८.

*- वि वे च न -*

सदर तक्रारीची चौकशी दि. ५/७/२०१० रोजी ठेवण्यात आली होती. तक्रारकर्ते व जन माहिती अधिकारी अनुपस्थित होते. कदाचित भारत बंद मुळे तक्रारदारांना, व शासकीय व्यवस्थेत राहिल्यामुळे तहसिलदार यांना उपस्थित राहता आले नसावे.

जन माहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक ४३८३/०२ मध्ये दिलेल्या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करावी व अनुपालन अहवाल आयोगास १० दिवसांत पाठवावा.

*----आदेश---*

तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०८.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/३५०१३/अपील क्र.५०४३/०२

श्री. अशोक रेड्डी ऊर्फ मुरली ------ अपीलकर्ता
UT No ३४७८ अंडा बेरक,
नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर- २०

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक ----- उत्तरवादी
गोंदिया
२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी
आमगांव, जि. गोंदिया.

*- वि वे च न -*

वरील अपीलाच्या दि. १३/१/२००९ रोजीच्या आदेशात जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी आमगांव यांचेकडे अधिनियमाच्या कलम २० अन्वये शास्तीची कारवाई का करु नये असा खुलासा मागितला होता.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ८/१२/२००९ रोजीच्या पत्राने खुलासा सादर केला आहे तो पुढीलप्रमाणे ---

एफ.एस.एल. कडून करण्यात आलेल्या नारको परीक्षणाची व्हि.सी.टी. ही सिलबंद अवस्थेत मुळ पुरावा म्हणून न्यायालयात दाखल करण्या ताअली व आता तो मा.न्यायालयाचे मुद्देमाल आहे. त्यामुळे अर्जदारांना त्यांची प्रत देणै अगर न देणे हे सर्वस्वी न्यायालयाचे अधिकार क्षेत्रामध्ये आहे. मूळ व्हिसीडी न्यायालयात जमा करण्यात आली असल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसल्याने अर्जदारांना पुरविण्यात आली नाही. ही वस्तुस्थिती कृपया विचारात घेण्यात यावी व अधिनियमाचे कलम २० अन्वये शास्तीची कारवाई करण्यात येऊ नये ही विनंती.

वरील दिलेला खुलासा लक्षात घेता शास्ती प्रकरण बंद करण्यात येत आहे.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
दिनांक: ०८.०७.२०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/३८२१४/अपील क्र.४०८०/०२

श्री. प्रदिप अेम सोनथालिया ------ अपीलकर्ता
१०, स्वाधीन सदन, सी रोड, मरीन ड्राईव्ह,
चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (प्रतिबंधक) ----- उत्तरवादी
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,
छत्रपती शिवाजी मंडई, ३ रा मजला, अेम.आर.अे.मार्ग
मुंबई ४०० ००१.

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त
गुन्हे, पोलीस आयुक्त कार्यालय, क्रॉफर्ड मार्केटसमोर,
मुंबई ४०० ००१.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्रीयत प्रदिप एम. सोनथालिया यांनी केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. ३/२/२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलार्थींनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे दि. १८/१२/२००८ रोजी अर्ज करुन पोलीस निरीक्षक श्री. आर.बी. माने व पोलीस निरीक्षक श्री.प्रमोद दिनकर साईल यांची समाजसेवा शाखेमध्ये नियुक्ती होण्यापूर्वी त्यांनी किती प्रकरणी दखलपात्र गुन्हे दाखल केले, तपास केला, मार्गदर्शन केले व सहभाग असलेल्या गुन्हयांची अनुषंगिक माहिती मागितली होती.

अपीलार्थींनी मागितलेली माहिती अनैतिक व्यापार प्रतिबंध या शाखेशी निगडीत नसल्याने व ती सदर शाखेच्या अभिलेखावर नसल्याने ती सदर शाखेकडून देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २९/१२/०८ च्या पत्रान्वये कळविले. अपीलार्थींनी मागणी केलेली माहिती गुन्हे शाखेअंतर्गत माहितीचा अहवाल वरिष्ठ पोलीस निरीक्षक, अनैतिक व्यापार

प्रतिबंध कक्ष, समाजसेवा शाखा, गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला अहवाल श्रीमती. के.पी. गावीत, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त यांनी अपीलार्थीस दि. ३१/१२/२००८ च्या पत्रासोबत उपलब्ध करुन दिला. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीने समाधान झाले नसल्याने अपीलार्थीनी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दि. ०६/१/२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. ९/१/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जातील मुद्दयांबाबत चर्चा न करता नवीन मुद्दे अपीलार्थीनी उपस्थित केले. त्यामुळे अपीलार्थींचे प्रथम अपील फेटाळले असे नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी दि. १२ जानेवारी २००९ रोजी आदेश पारित केले. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. सदर अपीलावर दि. २४/३/२००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी हजर होते.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

वरील विवेचन लक्षात घेता असे दिसून येते की, अपीलार्थीनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज करुन सर्वश्री माने व साईल, पोलीस निरीक्षक यांनी नोंदविलेल्या दखलपात्र गुन्हयांबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस दि. ३१/१२/२००८ च्या पत्रान्वये माहिती पुरविली. पण जी माहिती पुरविली आहे ती म्हणजे त्यांचे शाखेकडे अशी माहिती उपलब्ध नाही.

अपीलार्थीस हव्या असणाऱ्या माहितीचे अवलोकन केले असता एखादा पोलीस ऑफिसर सर्विसला लागल्यानंतर त्यांनी वेगवेगळया पोस्टींगमध्ये केलेले इनव्हेस्टीगेशन व प्रॉसीक्युशन रिझल्टींग इन टू पनीशमेंटच्या बाबतीत सतत एक विवक्षितपणे रेकॉर्ड ठेवले जात असेल तर तशी माहिती देणे शक्य होईल. तेव्हा अपिलीय अधिकारी यांनी (जे वरिष्ठ अधिकारी आहेत) अशा प्रकारची माहिती जेथे कुठे ठेवली जात असेल तर त्या कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांना अपीलार्थींचा अर्ज पाठवावा.

अशा पध्दतीने माहिती ठेवल्या जात नसेल तर अपीलार्थीस स्पष्टपणे कळवावे.

***---आदेश---***

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )

दिनांक: ०८.०७.२०१०

राज्य मुख्य माहिती आयुक्त.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपीले व कलम १८ खालील तक्रारी.

मुमाआ/अपील/ २००८/५९६०/अपील क्र.२१५१/०२
मुमाआ/अपील/ २००८/२६६०३/अपील क्र.२९७७/०२
मुमाआ/तक्रार/ २००९/३१०१२/तक्रार क्र.३५२/०२
मुमाआ/तक्रार/ २००९/३८५०१/तक्रार क्र.२७७/०२

१. श्री. महावीर अर्स ---- अपीलकर्ता/ तक्रारकर्ते
५०२, सरीता, स्वप्न नगरी, मुलुंड (पश्चिम)
मुंबई ४०० ०८०.
२. श्री. जोबॉय थॅडीकॅरेन
मेलडी, १ ला मजला, प्लॉट २७०,
सेंट ॲन्थोनी रोड, चेंबूर, मुंबई ४०० ०७१.
३. श्री. जहांगिर बी. गई
५९८/ अे, वाडिया बिल्डींग,
गिरगांव, मुंबई ४०० ००२.
४. श्री. भास्कर प्रभू
निमंत्रक, माहिती अधिकार मंच,
द्वारा- अे- ३१, रॉयल इंडस्ट्रीयल इस्टेट,
एम.एम.जी.एस.मार्ग, वडाला, मुंबई ४०० ०३१.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक उपायुक्त ------ उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका , टी वॉर्ड
मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०.

जन माहिती अधिकारी तथा सहायक करनिर्धारक व संकलक (टी)
देवी दयाल रोड, करनिर्धारक व संकलन खाते,
बृहन्मुंबई महानगरपालिका , टी वॉर्ड, तळमजला,
मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक उपायुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका , एम / पश्चिम विभाग,
१ ला मजला, आचार्य मार्ग, चेंबूर, मुंबई ७१.

जन माहिती अधिकारी तथा सहायक करनिर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका , एम / पश्चिम विभाग,
तळमजला, रुम नं. ४, रोड नं.१, चेंबूर, मुंबई ७१.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक उपायुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका , डी विभाग कार्यालय,
नाना चौक, मुंबई ४०० ००७.

जन माहिती अधिकारी तथा सहायक करनिर्धारक व संकलक
बृहन्मुंबई महानगरपालिका , डी विभाग कार्यालय,
नाना चौक, मुंबई ४०० ००७.

४. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ.प्र.)इ.एस.
उपमुख्य अभियंता कार्यालय (इ.प्र) इस्टर्न सबर्बन,
राज लिजन्सी जवळ, एल.बी.एस.मार्ग, विक्रोळी (पश्चिम)
मुंबई ४०० ०८३.

*- वि वे च न -*

वरील अपीले व तक्रार यांचा मतीतार्थ एकच आहे की, बृहन्मुंबई महापालिकेच्या करनिर्धारण विभागात वेगवेगळया पध्दतीच्या प्रतींसाठी कधी रु.२/- आकारणी केली जाते तर कधी परिपत्रक नं. AC/1/Gen Deted 1.4.2003 अंतर्गत जे रेटस् विहित केलेले आहेत त्या दरानेच आकारणी केल्या जातात.

याबाबत आयोगाने श्री. भोमी एम. मिस्त्री विरुध्द PIO Assessment & Collection Department यांच्या तक्रार क्र. २००७/३६१/०२ यावर पुढीलप्रमाणे निर्णय दिला होता.

" Therefore, if the provision in respect of fees to be charged given in the

**Maharashtra Government Rules and BMC rates are considered the following harmonious rate of fees would emerge.**

**i) Where the information in BMC is readily available and copy could be easily given by photo coping or other way-Rs.2/- for each page for A-4 or A-3 size paper should be charged. For larger size paper the actual charge should be taken.**

**ii) Rule 4 does not prescribe the fees for certified copies, therefore, if Appellant needs certified copies, whatever rates are prescribed by BMC for certified copies should be charged.**

**iii) At many places under BMC schedule of rates separate rates for copy and separate rates for attestation has been mentioned, In such case, for a copy the fee prescribed under rule 4(b) i.e. Rs.2/- per page etc should be schedule for attestation the fees presecribed under sechefule of rates of BMC should be charged.**

**iv) For inspection of record BMC has earlier presecribed certain fees, The rules framed under RTI Act shall prevail over any countrary provision under any other Act. The fees presecribed is "no fee for first hour and thereafter Rs.5/- for each 15 minutes or fracion therof thereafter. "**

**एवढा स्पष्ट निर्णय असूनहि केवळ २००३ सालचे परिपत्रक हे माहितीचा अधिकार अधिनियम लागू होण्याअगोदर विहित केलेले आहे असे गृहित धरुन कांही ठिकाणी रु.२/- प्रती पेज अशी आकारणी न करता सन २००३ सालच्या परिपत्रकाप्रमाणे आकारणी झालेली आहे अशाहि तक्रारी आयोगाकडे आलेल्या आहेत. याबाबत करनिर्धारण विभागाने सुध्दा आयोगास स्पष्टीकरण देण्याची विनंती केलेली आहे.**

**याबाबतीत अतिरिक्त आयुक्त महापालिका यांनाहि बोलाविण्यात आलेले होते व त्यांच्याशीहि चर्चा केलेला आहे. त्यांच्या पत्रातुन जर महापालिकेने सन २००३ साली रेटस् विहित केले असतील तर ते माहितीचा अधिकार अधिनियम लागू होण्याच्या अगोदर विहित केले**

असल्यामुळे ते ग्राहय धरण्यात यावे असे ध्वनीत होते.  असे जरी असले तरी महापालिकेत २/३ प्रकाराने रेटस्‌ची अंमलबजावणी केल्या जाते असे दिसून आलेले आहे.

याबाबतीत पुन्हा एकदा करनिर्धारक यांच्याशी चर्चा करुन व त्यांच्या कार्यालयामधील नस्त्या स्वत: तपासून पुढीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक निर्णय देण्यात येत आहे.

१. जरी महापालिकेचे सन २००३ सालचे परिपत्रक हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात येण्याअगोदरचे असले तरी यादरम्यान महापालिकेनेच दि. १/११/२००६ रोजी पुढीलप्रमाणे परिपत्रक जारी केलेले आहे.  हे परिपत्रक याअगोदर आयोगाच्या निदर्शनास आणले नव्हते म्हणून ते पुन्हा नमूद करण्यात येत आहे.

" बृहन्मुंबई महानगरपालिका "

परिपत्रक क्र कवसं/२७/स.सा.

दि. ०१.११.२००६

विषय - माहितीच्या अधिकारांतर्गत द्यावयाच्या माहितीसाठी आकारण्याचे सुधारित अनुसूची शुल्क.

सर्वसाधारण प्रकरणांमध्ये परिपत्रक क्र.कवस/१/स.सा. दि. ०१/०४/२००३ अन्वये आवश्यक असलेले दस्ताऐवज संबंधित पक्षकारास उपलब्ध करुन देण्यासाठी अनुसूची शुल्क निश्चित करण्यात आलेले असून ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील प्रकरणे वगळून कायम राहतील.

माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती मागविण्यात आली असता, एका प्रकरणात पक्षकाराने असे निदर्शनास आणून दिले की, वेगवेगळया विभागातून एकाच प्रकारच्या माहितीसाठी वेगवेगळे शुल्क आकारले जात आहे याची पुनरावृत्ती होऊ नये व सर्व विभागांतून माहितीच्या अधिकारांतर्गत देण्यात येणाऱ्या माहितीसाठी आकारल्या जाणाऱ्या अनुसूची शुल्कात समानता रहावी यासाठी पक्षकारास सदर शुल्क निश्चित करण्यासाठीचा प्रस्ताव सह आयुक्त (सुधार)/अति.आयुक्त(प्रकल्प)/म.न.पा. आयुक्त यांच्या मंजूरीसाठी सादर करण्यात आला. तद्‌अनुषंगाने म.न.पा. आयुक्त यांची क्र. एमजीसी/एफ/८४७७ दि. ०४/०९/०६ अन्वये माहितीच्या

अधिकारांतर्गत माहिती पुरविण्यासंबंधी आकारावयाचे शुल्क खालीलप्रमाणे निश्चित करण्यास मंजूरी प्राप्त झालेली आहे.

१. माहितीच्या अधिकारांतर्गत माहिती पुरविण्यासाठी नियम ४(अ)(ख) प्रमाणे माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात किंवा अन्य प्रतीच्या स्वरुपात चटकन मिळण्याजोगी असल्यास, त्याच्या छायांकित केलेल्या प्रत्येक पृष्ठासाठी रु.२/- किंवा प्रतीचा प्रत्यक्ष आकार आकारण्यात यावा.

२. उपरोक्त छायांकित प्रत साक्षांकित करुन/प्रमाणित करुन पुरविण्यासाठी व माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जाव्यतिरिक्त इतर बाबतीत विशिष्ठ निश्चित केलेले दर/फी आकारण्यात यावी.

सदर दर दि. १/१०/२००६ पासून लागू होतील याची सर्व उप करनिर्धारक व संकलक/ सहा.करनिर्धारक व संकलक यांनी नोंद घ्यावी. "

या परिपत्रकानुसार आधी जरी जास्त रेटस् दिलेले असले तरी छायांकित प्रतीसाठी रु.२/- आकारण्याचा महापालिकेचा निर्णय मनपा आयुक्त यांनी दिलेला आहे. याचाच अर्थ या निर्णयानुसार दि. १/४/२००३ च्या आदेशात महापालिकेने सुधारणा केलेली आहे याचेच द्योतक आहे.

या आदेशात दिलेला निर्णय लक्षात घेता आयोगाने जो श्री. बोमी मिस्त्री यांच्या प्रकरणामध्ये तक्रार क्र. २००७/३६१/०२ मध्ये निर्णय दिलेला आहे तो निर्णय कायम होत आहे.

शुल्क आकारणीबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जे तत्व आहे ते कलम ७(५) च्या परंतुकामध्ये दिलेले आहे ते पुढीलप्रमाणे ---

" परंतु कलम ६ च्या पोटकलम (१) अन्वये आणि कलम ७ ची पोटकलम (१)व (५) या अन्वये विहित केलेली फी वाजवी असेल आणि अशी कोणतीही फी ज्या व्यक्ती दारिद्रयरेषेखाली आहेत असे समुचित शासनाकडून निर्धारित करण्यात येईल अशा व्यक्तीकडून आकारण्यात येणार नाही. "

फी वाजवी असण्यावर माहितीचा अधिकार अधिनियम यामध्ये जोर दिला गेला आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. केंद्र सरकारमध्ये सर्वत्र रु.२/- प्रती पृष्ठ प्रमाणे माहिती मिळते हेहि लक्षात घेणे आवश्यक आहे.

त्यामुळे शुल्क आकारणीबाबतीत पुढील तत्वे पुन्हा एकदा स्पष्टपणे निर्धारित करण्यात येत आहेत.

१. दि. १/४/२००३ च्या महापालिकेच्या परिपत्रकामध्ये जे आयटेम आहेत त्यातील कागदपत्रांच्या (माहिती) छायांकित प्रतीसाठी (A4 किंवा A3 साईजच्या आकारासाठी ) रु. २/- प्रति पृष्ठ अधिक टपाल खर्च द्यावा लागेल.

२. मोठया आकारातील कागदाच्या प्रतीचा प्रत्यक्ष खर्च अधिक टपाल खर्च द्यावा लागेल.

३. अभिलेख पाहण्यासाठी पहिल्या तासाला कुठचेहि शुल्क नाही. त्यानंतरच्या प्रत्येक १५ मिनिटासाठी रु.५/- प्रमाणे शुल्क घेण्यात येईल.

४. साक्षांकित प्रतीसाठी महापालिकेचे दर लागू होतील.

वरील अपीलामध्ये व तक्रारींमध्ये वरील स्पष्टीकरणात्मक आदेशाप्रमाणे शुल्कआकारणी करावी. तसेच यापुढेहि याच तत्वाप्रमाणे शुल्कआकारणी करीत जावी. त्यामुळे पुढील आदेश देण्यात येत आहे.

***---आदेश----***

अपील व तक्रारी या वर दिलेल्या विवेचनानुसार निकाली काढण्यात येत आहेत.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०९.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००८/३४४७३/अपील क्र. ३५४८/०२

श्री. वसंत अंबादास गर्गे ------ अपीलकर्ता
स्वप्नवैभव अपार्टमेंट, अद्वैत कॉलनी,
कॅनडा कॉर्नर, शरणपूर रोड, नाशिक- ५.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा महाप्रबंधक ----- उत्तरवादी
उच्च न्यायालय यांचे कार्यालय, मुंबई ४०० ०३२.

२. जन माहिती अधिकारी
उच्च न्यायालय यांचे कार्यालय, मुंबई ४०० ०३२.

*- वि वे च न -*

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : दि.२५/४/२००८ चा अर्ज दि.८/५/२००८ रोजी प्राप्त.

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनाक : २७/०५/२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपीलाचा दि : ०६/६/२००८

प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि: ०८/८/२००८

द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : ०५/९/२००८ चे अपील दि.०९/९/२००८ रोजी प्राप्त.

सुनावणीचा दिनांक : १९/१/२००९

अपीलार्थी : उपस्थित.

जन माहिती अधिकारी : उपस्थित.

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : अपीलार्थी (निवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश ) यांनी त्यांच्या सेवाकाळात त्यांना जिल्हा न्यायाधीशांच्या संवर्गात निवड श्रेणी देऊन पदोन्नती देण्याबाबत दि.३१/१०/२००७ रोजी जे निवेदन दिले होते त्या निवेदनावर कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीचा

अहवाल मागितला.

जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर : मुंबई उच्च न्यायालयाच्या माहितीचा अधिकार नियम २००६ च्या तरतुदीनुसार विहित पध्दतीने माहिती अर्ज सादर न केल्याने माहिती नाकारण्यात आली.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : अपीलार्थी श्री. व्ही.ए.गर्गे यांना निवडश्रेणी मंजूर करण्याची बाब उच्च न्यायालयाच्या समितीच्या दि. १०/७/२००४ रोजी झालेल्या बैठकीत विचारार्थ होती. तथापि सदर समितीने त्यास मान्यता दिलेली नाही. श्री.गर्गे यांनी दि. ३१/१०/२००७ रोजी केलेले निवेदन समितीच्या बैठकीत ठेवण्यात येईल. बैठकीचे इतिवृत्त गोपनीय असल्यामुळे तसेच जनहित लक्षात घेता अपीलार्थीस कारणे कळविता येऊ शकत नाहीत, अशी माहिती देऊन प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती.: अपीलार्थी यांनी द्वितीय अपीलाद्वारे उच्च न्यायालयाच्या समितीसमोर दि. १०/७/२००४ रोजी झालेल्या बैठकीत अपीलार्थींच्या विरुध्द जो परिस्थितीजन्य पुरावा व अभिलेख मांडण्यात आला त्याची माहिती मागितली आहे. सदरची माहिती नव्याने मागण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी निदर्शनास आणले. नव्याने मागण्यात आलेली माहिती देखिल गोपनीय असल्यामुळे जनहित लक्षात घेऊन माहिती देता येऊ शकणार नाही असेहि प्रतिपादन जन माहिती अधिकारी यांनी केले. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे अपीलार्थींचे दि. ३१/१०/२००७ चे निवेदन समितीसमोर विचारार्थ ठेवण्यात येणार आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या संबंधित समितीने दि. ३१/१०/२००७ च्या अपीलार्थींच्या निवेदनावर निर्णय घेतला असल्यास तो त्वरित अपीलार्थीस कळविण्यात यावा असे निर्देश जन माहिती अधिकारी यांना देण्यात आले.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०९.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००९/४७३६७/अपील क्र. ५६१७/०२

श्री. भालचंद्र गायतोंडे ------ अपीलकर्ता
१०, मंदार अपार्टमेंट, सरस्वती बाग,
के.जी.एस. ओ. जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ४०० ०६०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक आयुक्त ----- उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, के/इस्ट वॉर्ड,
२ रा मजला, गुंदवली , अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

२. जन माहिती अधिकारी तथा असि. ॲसेसर आणि कलेक्टर
बृहन्मुंबई महानगरपालिका, के/इस्ट वॉर्ड,
२ रा मजला, गुंदवली , अंधेरी (पूर्व) मुंबई ४०० ०६९.

*- वि वे च न -*

अपीलार्थी श्री. भालचंद्र गायतोंडे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दि. १५/३/२०१० रोजी द्वितीय अपील दाखल केले. अपीलार्थींनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. २९/५/२००९ व दि. २०/१०/२००९ रोजी अर्ज करुन इस्माईल गांव जोगेश्वरी (पूर्व) स्नेहा भवन, श्री समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्था लि. नटवर नगर रोड क्र.५, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई येथील सिटी सर्व्हे क्र. २५, २५/१ ते ५ येथील मालमत्तेबाबत अनुषंगिक माहिती मागितली होती. अपीलार्थींच्या म्हणण्याप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांनी मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. असंबंध माहिती दिली. यामुळे अपीलार्थींनी दि. ६/१२/२००९ रोजी प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी आयोजित केली. सदर प्रकरणी जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस माहिती पुरविली असल्याचे नमूद करुन तसेच यामुळे अपीलार्थींचे समाधान झाले नसल्याने जागेची पहाणी करण्यासंबंधी नमूद करुन दि. ८/१/२०१० रोजी आदेश पारित केले. सदर मालमत्तेचे पुन्हा निरीक्षण कोणी करावे याबाबत संभ्रम निर्माण झाला. सदनिका धारकास मालमत्ता कर आणि दंडाची रक्कम मोठया प्रमाणात आकारण्यात आली. जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीचा रेकॉर्ड

ठेवला. मागणीप्रमाणे माहिती पुरविली नाही. यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

सदर अपीलावर दि. १९/४/२०१० रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. सुनावणीकरीता जन माहिती अधिकारी तसेच अपीलार्थी उपस्थित होते. सुनावणीचे वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले. तसेच अपीलातील कागदपत्रांची तपासणी करण्यात आली.

स्नेहा भुवन श्री समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्थेतील तळ मजल्यावरील सदनिका क्रमांक जी-१ व जी-२ बाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती ठेवली. सदर सदनिका अपूर्ण अवस्थेत होत्या. सदर सदनिका राहण्याजोग्या नव्हत्या. सदनिकेमध्ये पाण्याचा नळ, संडास, लादी काहीच नव्हते. मनुष्याला राहण्यायोग्य सुखसोई नव्हत्या. तरी दि. १/४/२००० पासून चुकीच्या पध्दतीने मालमत्ता कर, दंड, व्याज आकारण्यात आले असल्याचे अपीलार्थीनी आयोगासमोर प्रतिपादन केले. विभागामार्फत पुन्हा सदनिकेची अपीलार्थीसमवेत पहाणी करण्यात आली. त्यानंतर सदर मालमत्तेचा कर सुधारित करुन रु. १,१६,६८५/- इतका करण्यात आला. संस्थेच्या अध्यक्षांना एक विशेष नोटीस पाठविण्यात आली. सदर प्रकरण सहकर निर्धारक आणि जिल्हाधिकारी यांचेकडे निर्देशित करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी द्वितीय अपीलावरील सुनावणीच्या वेळी आयोगास लेखी अहवाल सादर करुन प्रतिपादन केले. सदर प्रकरणी सदनिकाधारकांना मोठया प्रमाणात मालमत्ता कर,दंड, व्याजआकारणी करण्यात आली. याबाबत अधिकृत कागदपत्र, जी-२ सदनिकाधारकानी अवैधरित्या शटर लावून टयूशन क्लासेस चालविले याबाबत अपीलार्थीस माहिती पुरवावी अशी अपीलार्थीची मागणी आहे. या परिस्थितीत सदर प्रकरणी मी असे आदेश देतो की, जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाचे आत अपीलार्थीच्या मागणीप्रमाणे रेकॉर्डला असलेली माहिती पुरवावी.

***---आदेश---***

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०९.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.

मुमाआ/अपील/ २००८/३७७१९/अपील क्र. ४०७०/०२

श्री. महावीर अर्स ------ अपीलकर्ता
५०२, स्वप्न सरिता को.ऑप.हौ.सोसायटी,
स्वप्न नगरी, मुलुंड (पश्चिम) मुंबई ४०० ०८०.

विरुध्द

१. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी ----- उत्तरवादी
व सक्षम अधिकारी
अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (ना.ज.क.धा)
बृहन्मुंबई यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
(ना.क्षे.क.म) बृहन्मुंबई
अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (ना.ज.क.धा)
बृहन्मुंबई यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत, ५ वा मजला,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१.

*- वि वे च न -*

माहिती अर्ज दाखल केल्याचा दिनांक : दि.५/०६/२००८ ( अर्ज दि.२/६/२००८)

जन माहिती अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाचा दिनाक : १३/०६/२००८

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल अपीलाचा दि : ०६/९/२००८

प्र. अपिलीय प्राधिकाऱ्याने पारित केलेल्या आदेशाचा दि: ०६/१०/२००८

द्वितीय अपील दाखल केल्याचा दिनांक : २६/१२/२००८

सुनावणीचा दिनांक : २३/०३/२००९

अपीलार्थी : अनुपस्थित.

जन माहिती अधिकारी : उपस्थित.

विचारणा केलेल्या माहितीचा तपशिल : अपीलार्थीनी दि. २/७/२००७ व दि. ४/१/२००८ रोजी

पाठविलेली पत्रे तसेच उत्तरवादी कार्यालयाने श्री.राणाभाई भानजी व इतर यांना उद्देशून पाठविलेल्या दि. २०/७/२००७ व दि. २७/१२/२००७ च्या पत्रांचा संदर्भ देऊन मालक/विकासक यांचेविरुध्द करण्यात आलेली कायदेशीर कार्यवाहीबाबत माहिती मागितली होती.

जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर : संबंधित जमीनधारकाचे नाव, नगर भूमापन क्रमांक तसेच कार्यालयीन संचिका क्रमांक याबाबतचा उल्लेख माहिती अर्जात केलेला नसल्याने त्याचा तपशील कळविल्यास अपेक्षित माहिती उपलब्ध करुन देता येईल असे कळविले.

प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याचे आदेश : १. अपीलार्थी यांचा अर्ज अंशत: मान्य करण्यात येत आहे. २. माहिती अधिकारी यांनी अपीलार्थी श्री. महावीर अर्स यांना पुन्हा सदर प्रकरणी नस्ती निरीक्षण करण्याची संधी द्यावी. तसेच अपीलार्थी यांनी नस्ती निरीक्षण दरम्यान त्यांना नेमकी आवश्यक असणारी माहिती/ कागदपत्रे विहित शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावयाची आहेत.

सुनावणीच्या वेळी निदर्शनास आलेली वस्तुस्थिती.: जन माहिती अधिकारी यांच्या दि. १३/६/२०१० च्या पत्राच्या अनुषंगाने अपीलार्थी श्री. महावीर अर्स यांनी त्यांच्या दि. २६/६/२००८ च्या पत्राने संचिका क्रमांक (File No.) व जमीनधारकाचे नांव कळविले. त्यानुसार संबंधित संचिकेचे निरीक्षण करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दि. ५/७/२००८ च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविले. त्यानंतर अपीलार्थी यांनी संचिकेचे निरीक्षण केले. परंतु नस्तीतील आवश्यक ती माहिती न मागता प्रथम अपील दि. ६/९/२००८ रोजी केले.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचे आदेश स्वयंस्पष्ट आहेत. त्यानुसार अपीलार्थी यांनी संबंधित नस्तीचे पुन्हा निरीक्षण केले नसल्यास ते करावे व आवश्यक ते शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

*----आदेश---*

अपील निकाली काढण्यात येत आहे.
संबंधितांनी उपरनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

( डॉ. सुरेश वि.जोशी )
राज्य मुख्य माहिती आयुक्त.

दिनांक: ०९.०७.२०१०

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५८७९/०२

श्री.अशोक परब ----अपिलार्थी
खो.नं.१६, चट्टीयार चाळ,
संभाजी चौक, न्यू मिल रोड, कुर्ला, पश्चिम
मुंबई -७०

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त --उत्तरवादी
बी वॉर्ड. मुंबई महानगरपालिका बाबुला टॅक क्रॉस लेन,
१२१, रामचंद्र भट्ट मार्ग, मुंबई ९

जन माहिती अधिकारी प्रभारी कार्यालयीन अधिक्षक
बी वॉर्ड. मुंबई महानगरपालिका बाबुला टॅक क्रॉस लेन,
१२१, रामचंद्र भट्ट मार्ग, मुंबई ९

- विवेचन -

अपिलाचा दिनांक ५.४.२०१०
सुनावणीची तारीख दि.३.७.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराचा दि.१.२.२०१० रोजीच्या अर्जास दि.१०.२.२०१० रोजीच्या अर्जावर दि.१०.३.२०१० रोजी उत्तर दिलेले आहे. ज्यात अर्जदाराने कागदपत्राच्या प्रती पेज शुल्क रुपये २/- भरावे, असे नमूद केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशात अर्जदारास माहिती विनामुल्य देण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे आयोगाने अपिलाच्या सुनावणीच्या वेळेला अर्जदारास माहिती ही विनामुल्य १० दिवसांचे आत देण्यांत निर्देश दिलेले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपिल निकाली करण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांक: ३.७ २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५८७८/०२

श्री.मिल्कासिंग बेदी, ----अपिलार्थी
२०० मेपला हाऊस,तिसरा मजला,
खो.क्र.५, बोरा बाजार स्ट्रि फोर्ट, मुंबई ४००००१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त --उत्तरवादी
बी वॉर्ड. मुंबई महानगरपालिका बाबुला टॅक क्रॉस लेन,
१२१, रामचंद्र भट मार्ग, मुंबई ९

जन माहिती अधिकारी प्रभारी कार्यालयीन अधिक्षक
बी वॉर्ड. मुंबई महानगरपालिका बाबुला टॅक क्रॉस लेन,
१२१, रामचंद्र भ्ज्ञट मार्ग, मुंबई ९

- विवेचन

अपिलाचा दिनांक ५.४.२०१०
सुनावणीची तारीख दि.३.७.२०१०
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून दि.१०.३.१९९९ रोजी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल तसेच त्यांच्या पत्नी व पत्नीचा भाऊ यांच्या समाजसेवा शाखेत घेण्यांत आलेल्या जबाबाची छायांकित प्रत मिळणेबाबतची मागणी होती.

जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार सदरील संकिर्ण कागदपत्रे २ वर्षापर्यत अभिलेखावर ठेवण्याची तरतूद आहे. त्यामुळे अर्जदाराच्या १० वर्षापूर्वीच्या कागदपत्राच्या मागणीची पूर्तता करता येणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाने सुनावणीच्या वेळी सांगितले.

अर्जदार व त्यांच्या पत्नी यांच्या वादाची परिणीती अंतिमतः फॅमिली कोर्टाकडून २००० साली घटस्फोट मंजूर होण्यात झाली असे कागदपत्रावरुन दिसते. त्यानंतर दिलेल्या तक्रारीच्या संदर्भात अर्जदाराच्या माहितीची मागणी दिसते. अभिलेखावर कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे ते देता येऊ शकणार नाही, हे मान्य करण्यांत येत आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

अपिल निकाली करण्यांत येत आहे.

मुंबई (डॉ. सुरेश वि.जोशी)
दिनांकः ३.७ २०१० राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५८९२/०२

श्री.उत्तमकुमार पटेल ----अपिलार्थी
पटेल हाऊस, मोती वाडी, टी.एच.के.रोड.
प्लॉटनं.९० एफ पी.न.९७, टीपीएस-ाा,
माहिम, मुंबई

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता-२ --उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे पश्चिम मुंबई ५१

जन माहिती अधिकारी सहा.अभियंता एस.आर.ए
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे पश्चिम मुंबई ५१

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १९.५.२०१०

सुनावणीची तारीख दि.६.७.२०१०

अपिलार्थी, अपिलीय अधिकरी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराला २ सी व १अे मध्ये पुर्नवसन इमारतीत राहणा-या व्यक्तीच्या यादया देण्यांत आलेले आहेत त्या साध्या कॉपीज देण्यांत आलेल्या आहेत. अर्जदारांने त्यांच्या अर्जात सदर कॉपीज सांक्षाकित कॉपीज द्याव्यात असे कुठेही म्हटलेले नाही. जर आता अर्जदारास साक्षांकित कॉपीज पाहिजे असतील तर प्राधिकरणाच्या नियमाप्रमाणे निर्धारित शुल्क असेल ते शुल्क घेऊन अर्जदारास साक्षांकित प्रती देण्यांत याव्यात.

गणसिध्दीविनायक एस.आर.ए. को.ऑप हौसिंग सोसायटी लि. एस.आर.ए. या संस्थेस सहकारी संस्था इमारत क्र. १ अे च्या बाबत सदनिका वाटपासंबंधीची यादी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (१)अन्वये पुरविण्याबाबत दि.८.६.२०१० रोजी निर्देश दिलेले आहेत. परंतू अजूनही यादी प्राप्त झालेली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. पुर्नवासित गाळयाचे वाटपाबाबतची अंतिम यादी ही एस.आर.ए.च्या रेकॉर्डला पाहिजे, जर अशी यादी संस्थेकडून सहजतेने मिळत नसेल तर सहकारी अधिकारी यांनी ही बाब अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, एस.आर.ए. यांचे निदर्शनास आणून संस्थेचे प्राधिकारी व विकासक यांना एकत्र बोलावून गाळेनिहाय यादी २१ दिवसांत निश्चित करावी व ती अर्जदारास देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

## आदेश

अपिल अंशतः मान्य करण्यांत येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपनिर्दिष्ट कार्यवाही करावी.

मुंबई
दिनांकः ६.७ २०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५८९३/०२

श्री.मधुकर कदम, ----अपिलार्थी
ए/४५, नीता अपार्टमेंट,
हुतात्मा चाफेकर बंधु मार्ग,
मुलूंड पूर्व मुंबई ८१

विरूध्द

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सह.संस्था(२) --उत्तरवादी
पूर्वउपनगरे, मुंबई कोकणभवन २ रा मजला,
नवी मुंबई४०००६१४

जन माहिती अधिकारी उपनिबंधक सहकारी संस्था
टी विभाग ए.सी.सी.कपांऊड, जे.एस.डी.मार्ग,
मुलूंड पश्चिम मुंबई ८०

- विवेचन -

अपिलाचा दिनांक १९.५.२०१०
सुनावणीची तारीख दि.६.७.२०१०

अपिलार्थी अनुपस्थित, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

"श्री. मधुकर बा.कदम यांचे दि.१४.१२.२००९ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने या कार्यालयाने दि.५.२.२०१० रोजीच्या पत्रान्वये माजी प्रशासक श्रीमती यु.बी.गरुड यांना सदरबाबत खुलाशेवार अहवाल सादर करणेबाबत लेखी कळविले होते. तद्नुषंगाने संबंधित प्रशासकांनी दि.१५.२.२०१० रोजी या कार्यालयास लेखी खुलासा सादर केला होता व त्याबाबतची माहिती श्री.मधुकर बा. कदम यांना दि.८.२.२०१० रोजीच्या माहितीच्या अधिकार अर्जात यापूर्वीच दिलेली आहे.

माजी प्रशासक श्रीमती यु.बी.गरुड यांचे कामकाजाविषयी अर्जदार यांनी दाखल केलेल्या तक्रारीची दखल घेऊन या कार्यालयाने दि.८.३.२०१० रोजीच्या आदेशान्वये श्रीमती यु.बी.गरुड यांचेऐवजी या कार्यालयाचे श्री.एस.जी.हिरे (सहकार अधिकारी, श्रेंणी-१)आणि श्री.वाय.ई.साळुंखे (सहकार अधिकारी, श्रेंणी-२) यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केलेली आहे. सद्यःस्थितीत संबंधित प्रशासक मंडळ संस्थेचे कामकाज सांभाळत आहे.

श्री. मधुकर बा.कदम यांनी या कार्यालयात वेळोवेळी दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.१७.३.२०१०, १०.५.२०१० व तसेच १७.६.२०१० रोजीच्या पत्रान्वये सविस्तररित्या कळविलेले आहे. तसेच या कार्यालयाने मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था-(२) पूर्व उपनगरे, कोकणभवन यांना संबधित संस्थेवर सन २००८-२००९ या कालावधीचे शासकिय लेखा परिक्षण होणेचे दृष्टीने शासकिय लेखा परिक्षकांची नियुक्ती करणेबाबत दि.२३.११.२००९

रोजीच्या पत्रान्वये विनंती वजा कळविलेले आहे. त्यामुळे संस्थेचे सन २००८-२००९ चे शासकिय लेखा परिक्षामार्फत ऑडीट करण्यांत येत आहे. "

त्यानुसार अर्जदारास रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली आहे असे दिसून येते. खात्रीच करुन घ्यावयाची असेल तर अर्जदार संबंधित नस्तीची तपासणी करु शकतात. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

## आदेश

अपिल निकाली करण्यांत येत आहे.

मुंबई<br>
दिनांकः ६.७ २०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)<br>
राज्य मुख्य माहिती आयुक्त

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**आदेश क्र. मुमाआ-२००९/अपिल क्र.५५९०/०२**

**श्री. विनय मोहन लाल** **अपिलार्थी**
**रु.म.नं.२० जैनहाऊस**
**४१/४३ पोलिस कोट लेन**
**फोर्ट, मुंबई ४०००१**

**विरूध्द**

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहसचिव --उत्तरवादी
सामान्य प्रशासन विभाग १०-अ
मंत्रालय,मुंबई ३२

**जन माहिती अधिकारी अवर सचिव**
सामान्य प्रशासन विभाग १०-अ
**मंत्रालय,मुंबई ३२**

**- विवेचन -**

**श्री.व्ही.एम.लाल मुंबई यांनी दि.१२ जानेवारी २०१० रोजी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये अर्ज करुन पुढील माहिती मागितली होती :-**

i) Upto date notings in the file, including the relevant papers on the correspondence side from which the Disagreement Note has been issued.

ii) Upto date notings dealing with my reply give to the disagreement Note on 8th October 2009

**जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास पुढीलप्रमाणे कळविले आहे :-**

**"आपल्या अर्जात नमूद केलेले प्रकरण शासनाच्या विचाराधीन आहे. माहितीचा अधिकार अधिनियमांच्या कलम ८ (छ) व (ज) अनुसार सदर प्रकरणी प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने निर्णय प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. यास्तव आपण मागविलेली माहिती आपणांस पुरविता येणार नाही . "**

**या विरुध्द केलेल्या अधिनियमाच्या कलम १९ (१) खाली अपिलाच्या निर्णयात अपिलीय अधिकारी तथा सहसचिव, सामान्य प्रशासन विभाग १०-अ, यांनी त्यांचे दि.१०.३.२०१० रोजीच्या आदेशानुसार अपिल फेटाळून लावले आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारण्याचा निर्णय कायम केला. या निर्णयाविरुध्द श्री.व्ही.एम.लाल. यांनी आयोगाकडे दि.१७मार्च २०१० रोजी व्दितीय अपिल दाखल केले त्या अपिलाची सुनावणी दि.९.४.२०१० रोजी घेण्यांत आला त्या वेळेला अपिलकर्ते, अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.**

**श्री. व्ही.एम.लाल यांनी आपणांला माहिती का देण्यांत यावी याचे समर्थन त्यांनी त्यांचे पुढील निवेदनात केलेले आहे :-**

**" DE was ordered unnecessarily by the government Shri asoke Basak was appointed Inquiry Officer.He gave his findings nearly** 3 ½ years back, exonerationg me from all the 8 charges framed against me. Instead of quickly accepting the findings of the Inquiry Officer and closing the matter, GAD took unduly long time of nearly 3 years to process this file. Based on some distorted and motivated notings and relying on certain events and notings and relying on certain events and occurrences which were not admissible in the DE proceedings. GAD recommended disagreeing with the clear findings of the Inquiry Officer. /they intentionally did not take the opinion of the Law & Judiciary department who could have clearly pointed out to gad the placing reliance on matters not within the purview of the DE was not legally permissible. Withour condisering the legal positon, GAD has therefore, suggested imposing some punishment on me, despite the clean chit given by the Inquiry Officer in his quasi-judicial proceedings. If the information asked by me is not furnished, I would be unable to adequately defend myself before Government of India and UPSC to shom the proposal would be sent for approval. It is in the background, that it becomes imperative that I should be furnished the informati9on asked for. In that case,the needle of suspicion on GAD of intentionally hiding the information would disappear.

In a normal and fair inquiry, information of noting on the file may not by shared, as decided by CIC, bul in the circumstances of my case, it is absolutely essential that such information should be supplied to me. Action should not only be fair, but should also appear to be fair. That is good governance. By furnishing this information, no harm would be caused to the government. The government has no issue of any secrecy of confidentiality from me. No particular public purpose would be served by keeping it confidential. In th recent years, the implementation of the act is guided by the concern of transparency by making more and more information available in public domain. Denial of information has to be limited, as much as possible only to such issues which are specifically exempted under the Act and are essential for some public good. "

**तसेच अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अपवादात्मक जे कलम वापरण्यांत आलेले आहे कलम 8 (1) (h) आणि 8 (1) (i) यातील 8 (1) (i)हे मंत्रीमंडळाच्या निर्णयाशी संबंधित असल्यामुळे हया प्रकरणामध्ये त्याचा संदर्भ हा अनाठायी आहे. कलम 8 (1) (h) नुसार जी माहिती दिल्यामुळे अपराधाची चौकशी करण्यास ज्यामुळे बाधा येईल किंवा खटला चालविण्याच्या प्रक्रियेमध्ये ज्यामुळे व्यत्यय येईल, अशी माहिती देण्यापासून अपवाद केलेला आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार अशी कोणतीही परिस्थिती त्यांच्या प्रकरणाबाबत नाही. त्यामुळे त्यांना माहिती देण्यांत यावी.**

**प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयाचे समर्थन करताना केंद्रिय माहिती आयोगाने दिलेल्या काही निर्णयाचा हवाला दिलेला आहे.**

**श्री. व्ही.एम. लाल यांनी अपिलात उपस्थित केलेल्या अपिलीय अधिक ारी यांचा काही मुद्यांचा खुलासा पुढील प्रमाणे आहे :-**

**"अपिलार्थीचा मुद्दा क्र. १ :- जन माहिती अधिका-यांनी असहमती टिप्पणीबाबत दिलेल्या माझ्या खुलाशाच्या नस्तीच्या टिप्पणीच्या प्रती उपलब्ध करुन देण्यास जो नकार दिला त्याबाबत केलेले अपिल फेटाळताना अपिलीय अधिका-यांनी चुक केली आहे.**

खुलासा :- अपिलकाराच्या या मुद्यांस कोणताही आधार नाही. जन माहिती अधिका-याने ज्या तरतूदीच्या आधारांवर माहिती नाकारली आहे. त्या तरतूदी स्पष्ट उल्ले्खित केलेल्या आहेत.

अपिलार्थीचा मुद्दा क्र.२ :- अपिलीय अधिका-यांने " सदर प्रकरणाची नस्ती मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सादर केली असल्याने नस्ती मुख्यमंत्री कार्यालयाकडून परत मागवून माहिती उपलब्ध करुन देणे शक्य नसते " जन माहिती अधिका-योच म्हणणे ग्राहय धरणे चुकीचे आहे. कारण अशी पध्दती अस्तित्वात नाही. मात्र सदर माहिती जर न्यायालयाने मागितली तर मुख्यमंत्री कार्यालयात प्रलंबित असलेली नस्ती परत मागवून न्यायालयास माहिती दिली जाते. मुख्यमंत्री सचिवालयाकडून नस्ती मागवून टिप्पणीची झेरॉक्स काढून तातडीने सदर नस्ती मुख्यमंत्री सचिवालयाकडे परत करणे अवघड नाही. अशा प्रकारे जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारण्यासाठी नमूद केलेले कारण क्षुल्लक असून माहिती नाकारण्याचा स्पष्ट उद्देश आहे. परंतू आता सदर नस्ती मुख्यमंत्री कार्यालयाकडून परत करण्यांत आली आहे.

खुलासा :- प्रस्तुत प्रथम अपिलावरील माझ्या निर्णयात नमूद केल्यानुसार सदर प्रकरणी माहिती नाकारण्याबाबत माहिती अधिकार अधिनियमातील कलम आणि 8 (1) (j)8 (1) (h) या प्रकरणात लागू होते. सदर कलमात जी तरतूद आहे ती म्हणजे माहिती देण्यामुळे तपास कामात (investigation) अडथळा येऊ शकतोण अशी माहिती नाकरता येते. अर्थातच अपिलार्थीने मागविलेली माहिती देण्यामुळे त्यांच्याविरुध्द सुरु असलेल्या चौकशीतील निर्णय प्रक्रियेत बाधा/दबाव येऊ शकतो. एका अशाच स्वरुपाच्या वेगळया प्रकरणी राज्य माहिती आयुक्तांच्या दि.१६.८.२००६ च्या निवाडयावरुन स्पष्ट होते की, कार्यवाही सुरु असलेल्या प्रकरणाची माहिती विशेषतः जी माहिती देण्यामुळे तपास/चौकशी प्रक्रियेत बाधा येऊ शकते, अशी माहिती देणे त्या त्या प्रकरणात गुणवत्तेनुसार नाकारता येते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात 8 (1) (j)8 (1) (h) च्या अनुषंगाने अपिलार्थीस माहिती नाकारण्याची जन माहिती अधिका-यांची कृती योग्य आहे. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीने उपस्थित केलेला हा मुद्दा गैरलागू आहे.

अपिलार्थीचा मुद्दा क्र.३ :- जन माहिती अधिका-याने त्यांच्या आदेशात सदर माहिती कलम ८ (१) (छ) ८ (१) (g) आणि ८ (१) (ज)८ (१) (h) अन्वये नाकारलेली आहे. कलम ८ (१)(झ) ८ (१)(i) खाली नमूद केलेला अपवाद माझ्या प्रकरणी लागू होत नाही. अपिलीय अधिका-यांनी उल्लेख केलेले

कलम ८ (१) (झ) ८ (१)(i) या प्रकरणी संबंधित नाही. जन माहिती अधिाक-यांनी ८ (१) (झ) ८ (१) (g) आणि ८ (१) (ज)८ (१) (i) अन्वये माहिती नाकारण्याची कृती सारासार विचार न करता काहीही करुन माहिती नाकारण्याच्या उद्देशाने केलेली आहे. सदर प्रकरणी अपिलीय अधिका-यांनी जन माहिती अधिका-यांना समज देऊन त्यांचा आदेश रद्द करणे आवश्यक होते.

खुलासा :- वरील मुद्यांमध्ये नमूद केल्यानुसार सदर प्रकरणी ८ (१) (ज)८ (१) (h) लागू होत असल्यामुळे जन माहिती अधिका-यांनी या प्रकरणी घेतलेला ८ (१) (ज)८ (१) (h) चा आधार अन्य तरतूदीच्या तुलनेने अधिक समर्पक आहे. मुख्य माहिती आयुक्तांनी अनेक निवाडयात या तरतूदीचे स्पष्टीकरण केलेले आहे. त्याच्रपमाणे विभागीय चौकशीशी संबंधित नस्तीवरील माहिती ही त्या विभागीय चौकशीचा अंतिम निर्णय होईपर्यंत उघड करता येत नाही. असा निष्कर्ष विविध प्रकरणी मुख्य आयुक्तांनी दिलेल्या निवाडयावरुन सुस्पष्ट होतो.

अपिलार्थीचा मुद्दा क्र. ४ :- ८ (१) (ज)८ (१) (h) खालील अपवादाचा विचार करता सदर तरतूद फक्त फौजदारी गुन्हयांच्या प्रकरणी लागे होते. तसा निष्कर्ष ८ (१) (छ) ८ (१) (g) खाली असलेल्या गुन्हे अन्वेषण प्रकरणांबाबतच्या तरतूदीवरुन निसंदिग्धपणे काढता येतो. त्यामुळे सदर अपवाद माझ्या प्रकरणी लागू होत नाही. या पार्श्वभूमीवर अपिलीय अधिका-यांनी माझे अपिल मान्य करुन जन माहिती अधिका-याचे आदेश रद्द करणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे अपिलीय अधिका-यांनी मुख्य माहिती आयुक्तांचा दि.१०.७.२००४ च्या निवडयाचा केलेला उल्लेख हा जन माहिती अधिका-यांनी नमूद केलेल्या कारणाव्यतिरिक्त आहे.

खुलासा :- अपिलकर्त्याच्या या मुद्दयात तथ्य नाही. (investigation) ही संज्ञा केवळ Criminal Proceeding शी संबंधित आहे हा सोयीचा अन्वयार्थ काढण्यांत आलेला आहे. या संदर्भात माहिती आयुक्तांच्या अनेक निवाडयात स्पष्टीकरण देण्यांत आलेले आहे. त्याबाबत संदर्भ सोबत जोडले आहेत. त्यावरुन सिध्द होईल की investigation ही संज्ञा civil matters मधील चौकशीबाबतही निर्विवादपणे लागू होते.

अपिलार्थीचा मुद्दा क्र.५ :- अपिलीय अधिका-यांने स्वतःहून अन्य एका पी.के.सहा विरुध्द महानगरी कोल फिल्डस या प्रकणी दि.१७.८.२००७ रोजी दिलेल्या निवाडयाचा आधार सदर अपिल फेटाळतांना घेतला आहे. पारदर्शकता हे चांगल्या प्रशासनाचे बोधचिन्ह असून माहिती अधिकार

अधिनियमाचा पाया आहे. जर एखादे प्रकरण कोणतेही पूर्वग्रह मनात न ठेवता व तटस्थपणे तपासले तर सदर प्रकरणाची टिप्पणी लपवून ठेवण्याची आवश्यकता राहणार नाही. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी एखाद्याशी हाडवैर अथवा शरिरीक इजा होण्याची भिती असल्याची परिस्थिती नसावी. अशा प्रकारे अधिका-याचे गोपनीय अहवाल देखील त्यांच्यासाठी गोपनीय ठेवले जात नाहीत. त्यामुळे सदर अपिल फेटाळण्यामागे अपिलीय अधिका-याचे काही विशिष्ट हेत असावेत.

खुलासा :- हे वस्तुस्थितीस धरुन नाही. वस्तुतः या संदर्भात अनेक निवाडयांमध्ये आयुक्तांनी हीच भूमिका घेतलेली आहे :-

अ) अर्जदाराने प्रथम अपिलीय अधिका-यावर अशोभनीय टीका केलेली आहे. माहिती नाकारण्याच्या समर्थनार्थ माहिती आयुक्तांचे सुमारे १२ निवाडे सोबत जोउले आहेत अशा पार्श्वभूमीवर

**" the atempt of A A. to uphold refusal to giving information smacks of some ulterior motive "** अशा आशयाचे विधान करणे हे संयुक्तिक नाही.

ब) विभागीय चौकशी कशी सुरु झाली याबाबतची पार्श्वभूमी इत्यादि मुद्यांचा या अपिलाशी सुतराम संबंध नाही.

क) याच परिच्छेदात अपिलाकारांनी विधी व न्याय विभागाचा सल्ला विचारात घेण्यांबाबत सूचित केले आहे. विभागीय चौकशीची प्रक्रिया ही **AIS (D & A) Rules, 1969** अनुसार केली जाते. त्यात विधी व न्याय विभागाचा सल्ल घेण्याची तरतूद नाही. आवश्यकतेप्रमाणे शिस्तभंगाविषयक प्राधिकारी तसा निर्णय घेऊ शकतात.

ड) अपिलकाराने याच परिच्छेदात **" Despite the clean cheat given by the Inquiry Officer"** असे म्हटले आहे हे वस्तुस्थितीस धरुन नाही. चौकशी अधिका-याने काढलेल्या निष्कर्षामध्ये **"supervisory hapse "** हा एक निष्कर्ष तीन दोषारोपांचे बाबतीत काढलेला आहे. अर्थात हया मुद्याचा देखील प्रस्तुत अपिलाशी संबंध नाही.

ई ) याच परिच्छोत शेवटी व पारदर्शकता याबाबत विवेचन केले आहे. त्या संदर्भात एका निवाडयातील परिच्छेद खालीलप्रमाणे उध्दृत करीत आहे :-

अपिलीय प्राधिका-यानी त्याच निर्णयामध्ये दिल्याप्रमाणे परिच्छेद ५ च्या शेवटी उध्दृत निवाडांतील भाग हा या पार्श्वभूमीवर स्वयंस्पष्ट आहे. एवढेच नव्हे तर एका अन्य प्रकरणी CIC हैद्राबाद यांनी दिलेल्या निवडयात स्पष्ट म्हटले आहे की,

**" the RTI Act apart form being a right-expanding instrument, it is also an instrument for improving governance. In that sense, it is always helpful to be guarded in interfering with the disciplinary proveeding, through which the managements enforce discipline within the organization and bring the fuilty employees to book (G.V,Rao vs centre for DNA Fingerprinting and Diagnostic, Hyderabad dt. 31.10.2008 CIC digest (Vol.II) २५४२ (१८४५) )"**

अपिलार्थीचा मुद्दा क्र.६ :- या प्रकरणी केंद्र शासनाकडे लवकरच काही शिक्षा बजावण्याचे प्रस्तावित करण्यांत येणार आहे. यास्तव सदर अपील प्राथम्याने सुनावणीस घेण्यांत यावे.

खुलासा :- विभागीय चौकशीचे स्वरुप हे गोपनीय असते. अपिलार्थीना शिक्षा प्रस्तावित झालेली आहे. हा त्यांचा निष्कर्ष कोणत्या आधारावर त्यांनी काढलेला आहे हे अनाकलनीय आहे. शिवाय विभागीय चौकशी अंतिम टप्प्यावर आलेली असताना AIS (D & A) Rules, 1969 च्या तरतूदीनुसार जेवढया संधी अपचारी अधिका-यास देणे अभिप्रेत आहे त्या दिल्या गेल्यानंतर पुन्हा अपचारी अधिका-यांचे म्हणणे विचारात घेणे किंवा वैयक्तिक सुनावणीची तरतूद हया नियमांतर्गत हया टप्प्यावर नाही. म्हणून या प्रकरणी अपिलकर्त्याने मागितलेल्या न देता येण्याजोग्या माहितीच्या आधारावर कोणते प्रयोजन साध्य होईल हे अपिलकर्त्याने कोठेही विशद केलेले नाही.

हया सर्व मुद्यांच्या पार्श्वभूमीवर तसंच हया संदर्भाती सर्व निवाडयांच्या पार्श्वभूमीवर हे अपिल पूर्णतः निराधार असून ते फेटाळण्यांत यावे. "

विभागीय चौकशी करीत असताना त्यातील कुठचा भाग कोणत्या वेळेपर्यंत गोपनीय स्वरुपाचा ठेवावयाचा हा नेहमीचाच वादाचा विषय राहिलेला आहे. आतापर्यंत वेगवेगळया न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार योग्यत्या पातळीवर ज्यांच्या विरुध्द कायवाही होत आहे त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळायला हवी हयावर कटाक्ष दिलेला आहे. माहितीचा अधिकार

अधिनियम अस्तित्वात आल्यानंतर विभागीय चौकशी बाबत असलेल्या गुप्ततेच्या बाबत अनेक निर्णयामध्ये चर्चा झालेली आहे. यातील काही निर्णय हे अपिलीय अधिकारी यांनी नमूद केलेले आहेत. चौकशीच्या नोटींग्जची माहिती न देण्याचे जेकारण दर्शविले जातें ते म्हणजे असे केल्याने त्या अधिका-यांनी काय लिहिलेले आहे याची माहिती उघड होईल कोणी ते लिहिले आहे हे उघड होईल . अशा प्रकरणामध्ये मात्र चौकशीच्या निकर्षाबाबत आपले म्हणणे कोणी निर्भयपणे मांडण्यास धजावणार नाही. तसे वेळोवेळी **Diciplinary proceeding** मध्ये नमूद केलेलया माहिती व्यतिरिक्त वेळोवेळी अनेक इतर माहिती देत राहिल्याने अपराधित्व सिध्द करण्यास त्यामुळे अडथळा येईल असेही कारण दर्शविले जाते.

सुप्रीम कोर्ट यांनी **U.P.government vs Raj.Narayan (1975)** या प्रकरणामध्ये निर्णय देताना शासनातील पारदर्शीपणा पुढीलप्रमाणे मांडलेला आहे:-

**" In a government of responsibility like ours, where all the agents of the public must be responsible for their conduct, there can be but few secrets. The people of this country have a right to know every public act, everything that is done in a public way, by their public functionaries. They are entitled to know the particulars of every public transaction in all its bearing. The right to know, which is derived from the concept of freedom of speech, though not absolute, is a factor which should make one wary, when secrecy is claimed for gransactions which can, at any rate, have no repercussion on public security cover with veil of secrecy, the common routine business, is onto in the interest of the public Such secrecy can seldom be legitimately desired. It is generally desired for the purpose of parties and politics or personal self-interest or bureaucratic routin. The responsibility of officials to explain and to justify their acts is the chief safeguard against oppression and corruption "**

तसेच माहिती अधिकार अधिनियम कलम २२ नुसार या कायदयातील तरतूदीना इतर कुठच्याही कायदयातील तरतूदीपेक्षा Supremcsy दिलेली आहे. अपिलीय अधिका-याच्या म्हणण्यानुसार प्रस्थापित कायदयातंर्गत अपिलार्थीस जी काय संधी मिळाली पाहिजे होती त्या सर्व संधी व त्या अंतर्गत माहिती त्यांना देण्यांत आलेली आहे. त्यामुळे आता त्यांना वेगळयाने माहिती देण्याची गरज नाही.

अपिलीय अधिका-याच्या म्हणण्यानुसार अर्जदारास कोणत्या पातळीवर ही चौकशी आहे हे जाणून घेण्याचे कारण नाही ही चौकशी ही गोपनीय स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळेला असे सांगितले की, शासनाने त्यांच्या पवित्रा कायम करुन जर ते प्रकरण केंद्र सरकारकडे पाठविले तर त्यांना कोणत्याही प्रकारचे म्हणणे मांडण्याची संधी त्यांना मिळणार नाही.

अशी संधी देय आहे किंवा नाही या बाबीवर शासन स्तरावर विचार करावा लागेल.

या विषयाबाबत विविध आयोगामध्ये सुध्दा वेगवेगळी मते दिसायला लागली आहेत. नुकत्याच Shri C.Seemtharmaiah vs Commissionerate of customs & Central excise Appeal No CIC/AT/A/2008/01238 dt.7.6.2010 रोजी निर्णय देताना अशा प्रकारची माहिती नदेण्याचे बहूमताने ठरविण्यात आले. मात्र ज्या आयुक्तांनी अशा प्रकारची माहिती देण्यात यावी असा पवित्रा घेतला त्यांचे मतही विचारात घेणे आवश्यक वाटते. पारदर्शकत्वाची आवश्यकता असून अशा केसेसमध्ये अपराध्यांना त्यांची बाजू मांडण्याची संपूर्ण संधी मिळण्याच्या दृष्टीने मागितलेली माहिती ही अधिनियमाच्या कलम ८ किंवा ९ मधील अपवादामध्ये बसते किंवा नाही याच कसोटीवर माहिती द्यावी किंवा नाही असे ठरविण्यांत यावे अशा शब्दात त्यांनी आपले Dissenting निर्णय दिलेला आहे.

Practical considration व शासन यांच्या अडचणी विचारात घेतल्या तर सध्याची परिस्थिती कायम ठेवावी असा निष्कर्ष काढता येईल. मात्र पारदर्शकत्वामध्ये आणखी काही माहिती प्राप्त करण्याची संधी मिळाल्यास ज्या Authority पुढे अर्जदारास आपले म्हणणे जास्त समर्थपणे मांडतांना आपले निरपराधीत्व सिध्द करण्याची संधी ही त्यामुळे प्राप्त होऊ शकते हेही नाकारता येणार नाही. अर्थात माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत माहिती कां पाहिजे याचे कारण द्यावे लागत नाही. त्यामुळे ही माहिती देय आहे किंवा नाही एवढेच पहावे लागेल. अशा परिस्थितीत

पारदर्शकत्वाला जास्त महत्व देऊन अर्जदारास हवी असणारी माहिती देय आहे असे ठरविण्यांत येऊन ती देण्यांत यावी असे ठरविण्यांत येत आहे.

सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत..

## आदेश

अपिल मान्य करण्यांत येत आहे.

अपिलार्थीस हवी असणारी माहिती १५ दिवसाचे आत देण्यांत यावी.

मुंबई
दिनांक: ९.७ २०१०

(डॉ. सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त